हीरकमहोत्सवी कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

स्थापना : १९६४


६

# मासिक नवस्नेह

ब्रह्मतेजो बलंबलम्

वर्ष १० वे : अंक ३
जून २०२४

स्वागतमूल्य
₹. 30/-




प्रेषक

**कोल्हापूर चित्पावन संघ (रजि.)**

४२८, बी वॉर्ड, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ,
कोल्हापूर ४१६ ०१२. फोन : ०२३१-२५४६२२५, मोबा. ७६२०५४६२२५
Visit us on www.kolhapurchitpavan.com
ईमेल : kolhapurchitpavan@gmail.com
https: //www.facebook.com/kolhapurchitpavan

## भगवान श्री परशुराम जयंतीनिमित्त 'झाडे वाचवा, झाडे जगवा' अभियान




कोल्हापूर चित्पावन संघ, परशुराम चषक क्रिकेट स्पर्धा समिती, व ब्राह्मण सभा करवीर मंगलधाम, संस्थांच्या तर्फे छत्रपती शिवाजी महाराज जयंती व भगवान श्री परशुराम जयंती निमित्त शेंडा पार्क येथील प्रचंड उन्हामुळे वाळत चाललेल्या जवळपास ४०० झाडांना पाणी घालून 'झाडे वाचवा, झाडे जगवा' असा पर्यावरण अभियानाचा महत्त्वाचा उपक्रम हाती घेतला होता. यावेळी हक्कदार श्री महालक्ष्मी पूजक, कऱ्हाडे ब्राह्मण संघ, अखिल भारतीय ब्राह्मण परिषद, कोल्हापूर जिल्हा पुरोहित संघ, अशा विविध ज्ञाती संस्थांचे पदाधिकारी, संचालक व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी मकरंद करंदीकर, प्रसाद भिडे, किरण जोशी, केदार जोशी, संतोष साने, संतोष कोडोलीकर, श्रीकांत लिमये, रामचंद्र टोपकर, प्रसाद खाडिलकर, रमेश सखदेव, श्याम जोशी, ड. पूजा जोशी, संगीता आपटे, सौ गोरे, विनिता आंबेकर, निखिल जोग, महेश कुंटे, योगिता इनामदार, वर्षा जमदग्नी, राजेश गणपुले, केदार वाघापूरकर, वेदमूर्ती स्वप्निल मुळे, गौरव मुळे, श्वेता कुलकर्णी, सतीश अंबर्डेकर, वृक्षप्रेमी संघटनेचे सागर वासुदेवन यांच्या मार्गदर्शनाखाली चार खाजगी टँकरने तेथील वृक्षांना पाणी देऊन वृक्ष संवर्धनाचे सामाजिक कार्य केले. याप्रसंगी ७० ते ८० कार्यकर्त्यांची टीम सक्रिय होती.

## संघाच्या महिला भिशीतर्फे चैत्र हळदीकुंकू समारंभ संपन्न




कोल्हापूर चित्पावन संघाच्या महिला भिशी मंडळातर्फे चैत्र हळदीकुंकू समारंभ आयोजित करण्यात आला होता. या समारंभात सौ. संगीता आपटे, सौ. सीमा गोखले, सौ. पंकजा गोरे व भिशीच्या सर्व भगिनी उपस्थित होत्या.

## कोल्हापूर चित्पावन संघाचा वर्धापन दिन



मंगळवार, दि. ४ जून, २०२४ रोजी कोल्हापूर चित्पावन संघाचा 'हिरकमहोत्सवी वर्धापन दिन' सोहळा साजरा करण्यात येणार आहे. याप्रसंगी संघाच्या कार्यालयात सकाळी श्री सत्यनारायण महापूजा संपन्न होणार असून दुपारी ४ ते ७ वाजेपर्यंत सर्व सभासद व हितचिंतकांनी कोल्हापूर चित्पावन संघाच्या कार्यालयात येऊन तीर्थप्रसादाचा लाभ घ्यावा, ही विनंती.

आपले नम्र,

केदार जोशी — कार्यवाह

मकरंद करंदीकर — अध्यक्ष

आणि सर्व संचालक मंडळ सदस्य

कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

# नवस्नेह

वर्ष १० वे : अंक ३ : जून २०२४

- **संपादक** श्री. सदानंद दिनकर मराठे
- **कार्यकारी संपादिका** प्रा.सौ. मंजुश्री गोखले 8805355200
- **सल्लागार** सौ. पल्लवी देशमुख 9420455984

## अनुक्रम

१) **संपादकीय** /४

२) **भ्रमनिरास** /५ - सौ. कमल हर्डीकर

३) **माझी बँकेतील मुशाफिरी** /९
- शब्दांकन : श्रीकांत शिंत्रे, सौ. ज्योत्स्ना शिंत्रे

४) **मुलांचे पान** / १२

५) **ज्ञानसूर्याची सावली** /१४ - सौ. मंजुश्री गोखले

६) **सोपानदेवांची 'अलौकिक सोपानदेवी'** / १७
- सौ. मंजुश्री गोखले

७) **सप्त चिरंजीव** / १८ - सौ. ज्योत्स्ना शिंत्रे

८) **साहित्यिकांची टोपणनावे** / १९ - संकलित

९) **भारतीय संगीताची आवश्यकता**/२०

१०) - अमर जांभळे

११) **मुस्लिम स्त्री कलाकार** /२१ - प्रकाश गानू

१२) **बंगालचे लोकमान्य टिळक - सखाराम गणेश देऊसकर** / २३ - प्रकाश देशपांडे

१३) **वधूवर माहिती यादी** /२५

- **मुद्रण स्थळ** मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए, शिवाजी पेठ, कोल्हापूर. मोबा. ९९२१६६९६६६
- **अक्षरजुळणी** ज्योती अरुण काटवे विराज कॉम्प्युटर सर्व्हिसेस, कोल्हापूर. मोबा. ९०२१२३४८९०



हीरकमहोत्सवी

## कोल्हापूर चित्पावन संघ

मंगळवार पेठ, फोन : ०२३१-२५४६२२५
०२३१-२९९१६७३, मोबा. ७६२०५४६२२५

- **संचालक मंडळ**

**श्री. मकरंद विष्णू करंदीकर** (अध्यक्ष) 9421113005
**श्री. प्रसाद प्रभाकर भिडे** (उपाध्यक्ष) 9822248500
**श्री. केदार वसंत जोशी** (कार्यवाह) 7588839527
**श्री. संतोष वसंतराव साने** (सहकार्यवाह) 8459019091
**सौ. संगिता संजय आपटे** (खजिनदार) 8149480034

- **संचालक**

श्री. सदानंद दिनकर मराठे 0231-2541823
सौ. सीमा सुरेश गोखले 9420455159
श्री. हृषिकेश भालचंद्र लिमये 9404260470
श्री. किरण विनायक जोशी 9890003810
श्री. श्रीकांत अनंत लिमये 9423980380
श्री. दत्तात्रय वामन आपटे 9422043366

- **तज्ञ सल्लागार**

श्री. प्रसाद खाडिलकर 9822084305

- **सल्लागार**

श्री. विष्णू दिनकर वझे 9637255984
श्री. मोहन मधुकर दातार 9881874701
श्री. शिरीष श. ताम्हनकर 9422590025
श्री. निनाद खरे 7057151549
श्री. महेश खाडिलकर 9422046611

**कामकाजाची वेळ**
**सकाळी १० ते सायंकाळी ६ (साप्ताहिक सुट्टी नाही)**

या अंकातील लेखातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

**'नवस्नेह' मासिकाची ठेव, वर्गणी अगर इतर कोणत्याही पेमेंटसाठी**
**'कोल्हापूर चित्पावन संघाचे' खात्यांची माहिती पान क्र. २० वर दिली आहे.**

# संपादकीय...

नमस्कार मंडळी !

'मान्सून अंदमानात दाखल, ३० तारखेला केरळात येणार, यंदा सरासरीपेक्षा जास्त पाऊस. १०६% पाऊस पडणार.' आहाहा ! पेपरमधल्या या नुसत्या बातम्या वाचून आनंदानं डोळे पाणावले. तर नभ उतरू आलंऽऽऽ ! रिमझिम गिरे सावन ! अशी गाणी ऐकत मनाला वाटून घेत असलेला खोटा खोटा दिलासा खरा ठरणार असं या बातम्या वाचून वाटायला लागलं. पावसाला आपण इतके आसावलो ना, की तो चातक पक्षी सुद्धा लाजला असेल. अर्थात कारणही तसंच आहे म्हणा. अहो, काय काय, ऊन का काय? असं वाटत होतं, आकाशातून नव्हे, तर हाताच्या अंतरावरून सूर्य आग ओकतोय !

मित्रांनो, हा अंक तुमच्या हातात पडेपर्यंत मे संपलेला असेल आणि कदाचित पाऊस सुरूही झाला असेल. मात्र मुंग्या, कावळा, बेडूक, चातक पक्षी आणि हवामान खाते यांचा अंदाज चुकू नये रे ईश्वरा ! अर्थात या तप्त वातावरणात डोळे निववायला आपला नवस्नेह आहेच.

मित्रांनो, या अंकापासून तुम्हाला सांगितल्याप्रमाणे 'सप्त चिरंजीव' हे नवीन सदर आपण सुरू करतो आहोत. चिरंजीवत्व लाभलेल्या सात व्यक्तीरेखांची वेगळ्या दृष्टिकोनातून ही लेखमाला लिहित आहेत आपल्या नवस्नेहच्या मुंबईच्या लेखिका ज्योत्स्ना शिंत्रे. शिवाय आपल्या इतर लोकप्रिय लेखमाला आहेतच. आपणाला ही नवीन लेखमालाही नक्की आवडेल.

४ जूनला संघाचा वर्धापन दिन आहे. शिवाय आता संघातर्फे नवनवीन कार्यक्रमांचं आणि उपक्रमांचं आयोजन केलं जातय. जुन्या उपक्रमांसोबत या नव्या उपक्रमांची माहिती सुद्धा आपल्या अंकात आहेच. नवस्नेह असा सर्वांग सुंदर व्हावा हा आमचा नेहमीच प्रयत्न असतो. पण मित्रांनो, माझी एक लहानशी तक्रार आहे ! तुमच्याकडून आम्हाला अभिप्राय किंवा काही सूचना अथवा मार्गदर्शन हवं असतं. ते दिलं तर आम्हाला आणखी सुधारणा करता येतील.

**हम आईना नही, जो कमियां गिनाएंगे ।**

**हम दोस्त है, जो हर कमी को खुबी से निभाएंगे।।**

तेव्हा अभिप्राय द्या हं ! आम्ही प्रतिक्षेत आहोत.

मित्रांनो, हा अंक हातात पडेपर्यंत निवडणुकांचे निकाल जाहीर झाले असतील, किंवा होतील आणि मग चित्र स्पष्ट होईल की आपला देश कोणत्या मार्गावरून वाटचाल करणार आहे ! हिंदू धर्मसंस्कृतीच्या की निव्वळ सहिष्णुतेच्या ! आपल्या मुला-नातवंडांना आपण काय वारसा देणार आहोत हे ठरविणारी ही निवडणुक होती हे निश्चित ! असो !

मित्रांनो, कोल्हापूरचे ज्येष्ठ साहित्यिक श्री. चंद्रकुमार नलगे यांचे १०० वे पुस्तक नुकतेच प्रकाशित झाले आहे, याबद्दल नवस्नेह परिवारातर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन ! तसेच आपल्या नवस्नेहच्या दिवाळी अंकाची तयारी आम्ही सुरू केली आहे. कुणाला काही लेख, कथा, कविता द्यायच्या असतील तर त्या वेळेवर द्याव्यात, म्हणजे दिवाळी अंकात छापता येतील. दरवर्षीप्रमाणेच आपला दिवाळी अंक याही वर्षी खमंग, खुसखुशीत आणि देखणा असणार आहे. अगदी दिवाळीच्या फराळा सारखा ! मग लागताय ना तयारीला? फराळाच्या नव्हे, लेखांच्या !

धन्यवाद !

आपली स्नेहांकिता,

**सौ. मंजुश्री गोखले,** मो. ८८०५३५५२००

**नवीन तहहयात सभासद होण्याची संधी**

**संघाची सभासद वृद्धी योजना सुरू झाली असून या योजनेत रु. २६०/- मध्ये तहहयात सभासद होण्याची संधी मिळणार आहे. तरी ज्ञाती बांधवांनी या सुवर्णसंधीचा फायदा घ्यावा.**

# भ्रमनिरास

**(लेखांक ५)**

किरणच्या सविस्तर पत्रातील प्रत्येक ओळी बरोबर आठवणींचे अनेक मणी केशवभोवती गोळा होऊ लागले. बारा वर्षांचा होईतोवर तो गावात खूप छान खरं तर वैभवात रहात होता. मोठं घर, मागं-पुढं प्रशस्त अंगण, गावात फक्त आमचं घर होतं. जिथं तीन सायकली होत्या. एक बाबांची, एक किरण दादाची आणि सर्वात जुनी सायकल अण्णाप्पा बाजारहाट करण्यासाठी आणि केशवला शाळेत सोडण्यासाठी वापरायचा. झाडलोट, इतर कामं, बाजारहाट वगैरे सगळी कामं अण्णाप्पा करायचा. हिराबाई धुणं, भांडी इ. एक सुखवस्तू कुटुंब म्हणून आमच्या घराकडे पाहिलं जायचं. दारातून अंगणाच्या पायऱ्या चढून वर आलं की छान बंदिस्त गोठा आणि त्यात शांता गाय. बाबा पायऱ्या चढून वर आले की शांता हंबरायला लागायची. बाबांनी जाऊन तिच्या पाठीवरून हात फिरवला की शांत व्हायची. आई स्वयंपाकघर सांभाळताना ती स्वत: मॅट्रिक असल्याने आमच्या अभ्यासकडेही लक्ष द्यायची. अलिकडे तर बाबा, ‘काय रे पोरांनो, एखादी छान फटफटी घेऊ या का?’ असाही प्रश्न विचारू लागले होते.

पण त्या एका घटनेनं सारं आयुष्य बदललं. आम्हा मुलांना तर गाव सोडून जायचंच नव्हतं, पण बाबा गाव सोडून मोठ्या शहरात जाण्याच्या विचारावर अगदी ठाम होते. ते म्हणत, ‘आता संस्थानं राहणार नाहीत. न्यायव्यवस्थेत अमूलाग्र बदल होतील. काळाची पावले ओळखता आली पाहिजेत’. त्यादृष्टीने सर्व हालचाली करून आम्ही कोल्हापुरात आलो. आमच्या शाळा सुरू झाल्या.

गाव सोडून शहरात स्थायिक होण्याचा सर्वात जास्त त्रास, कष्ट आणि दगदग आईला झाली. स्वयंपाक, धुणं-भांडी, केर-वारे, बाजारहाट याखेरीज दर दहा पंधरा दिवसांनी तिला शेणाने जमिनीही सारवायला लागत. हमालीचे पैसे वाचवण्यासाठी सुरुवातीची एकदोन वर्षे ती स्वत: वखारीत जाऊन हातातून चुलीसाठी लाकडी घेऊन यायची. भाजी आणणे आणि ती निवडून देणं यासारखी अनेक छोटी-मोठी कामं आजोबा करत.

‘आई गावाकडे आपण किती छान रहात होतो. उगाच आपण या शहरात आलो असं तुला नाही का वाटत?’

या माझ्या प्रश्नावर आई म्हणाली, ‘गावात राहिलो असतो तर वकिलसाहेबांची मुलं म्हणून, खरं तर वशिल्यानं तू आणि किरण गावात किंवा जवळपासच्या गावात आयुष्यभर मास्तर किंवा कारकून होऊन राहिला असतात. किरण इंजिनिअर होईल, पाठोपाठ तूही होशील. कांचन बी.कॉम होऊन तिच्या पायावर वेळ आली तर नक्की उभी राहू शकेल. हे सारं गावातच राहिलो असतो तर शक्य होतं का याचा विचार करा. मला कष्ट होतात, पण ते कष्ट करण्याची ताकद आणि निरोगी प्रकृती देवानं मला दिली आहे ना? मग झालं तर. उगाच नको त्या गोष्टींचा विचार करत राहू नका.’

किरण नेहमी म्हणायचा, ‘राजकारणात मी कुठल्या कुठं गेलो असतो, पण तिथंही बाबा आडवे आले. गोवा मुक्ती संग्राम चळवळीतील माझा निर्भय सहभाग आणि तडफदार वक्तृत्व पाहून अनेक वरिष्ठ राजकीय नेत्यांच्या मी नजरेत येऊ लागलो होतो. एकदोन वर्षे पुण्यात उमेदवारी करून मी राजकारणात नेता झालो असतो. पण शिक्षण पूर्ण कर, इंजिनिअर हो. स्वत:च्या पायावर उभा रहा आणि खुशाल राजकारणात जा. शिक्षणासाठी मी पैसे देईन, पण राजकारणाची उमेदवारी करण्यासाठी एक छदामही देणार नाही. द्वितीय वर्षाला तू दोनता नापास झाला आहेस. यावर्षी पास झालास तर पुढच्या वर्षी पैसे नाही तर नाही. या बाबांच्या शब्दांनी नाईलाजाने मला राजकारण सोडावे लागले.’

किरणदादाचं लग्न, कोल्हापूरच्या घरांत उषावहिनींची आईनं केलेली बाळंतपणं आणि नवीन बाळाच्या जन्मानं घरात फुलणारं चैतन्य यांसारख्या असंख्य आठवणींच्या आवर्तातून बाहेर येत केशवनं किरणचं सविस्तर पत्र वाचून संपवलं. तरीही आईबाबांना सदनिका पूर्ण होईतोवर किरणकडे ठेवावं की पुण्यातच आणावं याचा उलगडा त्याला करता येत नव्हता. तेवढ्यात इंजिनिअर साहेब अशा हाका देत घरमालक केशवकडे आले. क्षणाचीही उसंत न घेता ते बोलू लागले. 'हे पहा, तुमच्या खोलीशी संलग्न जो तीन खोल्यांचा ब्लॉक आहे ना, तो पुढच्या महिन्यांत रिकामा होणार आहे. तुमच्या माहितीत कोण घराच्या शोधांत असेल तर त्यांना सांगा.' अभावितपणे केशव बोलून गेला, 'काका, मीच भाड्याने घेईन तुमचा ब्लॉक. आईबाबांना पुण्यालाच रहायला घेऊन येणार आहे. माझाही प्रश्न सुटला. जागेचा शोध घेत रहायला नको.'

साऱ्या गोष्टी सुरळीतपणे पार पडून आईबाबा एक महिन्यांत पुण्याला रहायलाही आले. केशव त्यांना म्हणाला, 'आई, बाबा बांधलेलं सामान सोडत राहू नका. दोन वर्षाच्या आत आपण नव्या, स्वत:च्या घरात रहायला जाणार आहोत.'

बाबांनी मुख्यत: पुस्तकं आवरली. बरीचशी सुस्थितीतील पुस्तके वाचनालयात नेऊन दिली. बरोबर एक वर्ष दहा महिन्यांनी सदनिका तयार झाली. छोटीशी वास्तुशांत करून तिघेजण रहायला गेले. नव्या, स्वत:च्या वास्तूत रहायला आल्यापासून आईने केशवच्या मागे आला. लग्न कर असा लकडा चालू केला. आणि 'हे बघ केशव, तू कुणी पसंत केली असलीस तर तसंही अगदी निर्धास्त होऊन सांग.'

'नाही गं आई, तसं काहीही नाही. तुम्ही चौकशी करा. सगळ्यांच्या पसंतीनं तुझी सून आणायची. मुख्य म्हणजे ती शिकलेली हवी. अगदी इंजिनियर असेल तरी चालेल.' स्वप्नवत् वाटावं अशा घटना पाठोपाठ घडत गेल्या. केशव आणि इंजिनिअर असलेल्या शीतलचं लग्न झालं. लग्नानंतर कांही दिवसातच त्याच्या कंपनीनं त्याला पाच वर्षांसाठी अमेरिकेला पाठविणार असल्याचं पत्र हाती आलं. घरी फोन आला. केशव आणि शीतल अमेरिकेला गेल्यानंतर सदनिकेशी संबंधित सर्व आर्थिक व्यवहार पार पाडण्याची जबाबदारी शीतलच्या आई-बाबांनी घेतली. त्यासाठी आवश्यक ती बँक खाती सुरू करण्याची कामेही मार्गी लागली. आई-बाबा मी तुम्हाला पुण्याला आणलं आहे. त्यामुळे तुमचा खर्च मीच करणार असं सांगत गणेश आणि शारदाचं जॉईंट खातं असलेलं पासबुक केशवनं (गणेशकडं) बाबाकडे सुपूर्द केलं. दर महिन्याला या खात्यात पुरेशी रक्कम जमा होईल हे सांगायला केशव विसरला नाही.

केशव आणि शीतल अमेरिकेला गेल्यानंतर वाढत्या वयाची साथ बरोबर घेऊन खऱ्या अर्थाने शांत निवृत्त आयुष्य गणेश आणि शारदा उपभोगत होते. किरण पूर्वीची नोकरी सोडून पुण्याजवळ चिंचवडला आला होता. त्या सर्वांची महिन्या-दोन महिन्यांत भेट होई. एरवी फोन होताच केशवचा आठवड्यांतून दोनदा अगदी नियमीत फोन येत असे. वर्षातून एकदा दोन्ही लेकी कुसूम आणि कांचन नातवंडांसह सात-आठ दिवस तरी येऊन जात. एकूण सारं आयुष्य छान चाललं होतं. चार वर्षांनंतर केशव-शीतल छोट्या विहानला घेऊन आले होते. पण सर्वांना भेटण्यात त्यांना फारसं निवांत गणेश-शारदाकडे राहता आलं नाही. त्यांच्या बोलण्यातून ते कायमचेच अमेरिकेला राहतील असं निश्चितच गणेश-शारदाला उमजलं.

काळ धावत होता. गणेश शारदाला पुण्यात येऊन अकरा वर्षे होत आली. सकाळचे आठ वाजायला आले तरी गणेश उठला नाही म्हणून शारदा उठवायला गेली. गणेश तापाना फणफणला होता. तिने ताबडतोब मिठाच्या गार पाण्याच्या पट्ट्या कपाळावर ठेवल्या. ताप उतरला, पण गणेशला श्वास घ्यायला त्रास होत होता. अंतराने किरण सर्वांत जवळ म्हणून तिने त्याला फोन करून सर्व हकिकत सांगितली. 'तू ये, पण तुला शक्यच नसेल तर निदान

मीनाला स्कूटर घेऊन येऊ दे.' किरण उत्तरला.

'ए आई, उगाच बाऊ करू नको. १९४८ साली चौघांचा मार त्यांनी पचवला आहे. क्रोसिन दे त्यांना. बरे वाटेल. मीनाचं कॉलेजचं शेवटचं वर्ष आहे. तिला उगाच वेळ फुकट घालवून चालणार नाही.' शारदाने फोन ठेवला.

ताप थोडा कमी झाल्यावर शारदानं वॉचमनला हाका मरून सांगितलं, 'दादा आजोबानं इथल्या शतायू हॉस्पिटलमध्ये न्यायचं आहे. रिक्शा घेऊन याल का?'

शारदा आज्जीच्या शब्दांनी बाल्कनीत असलेले रेड्डी रिक्शा मागोमाग स्कूटर घेऊन धावले. दवाखान्यात सर्व प्रकारची मदत तर त्यांनी केलीच, पण रिक्शाने घरी सोडताना डॉक्टरनी सागितलेली औषधे त्यांच्याकडे दिली. शारदाने दिल्लीला कुसूमला फोन केला. सर्व ऐकून ती म्हणाली, 'आई, आठ-दहा दिवसांनी शेखर आणि शिवानी तुझ्याकडे रहायला येणार आहेत. त्याऐवजी आज किंवा उद्या मिळेल त्या विमानाने तुझ्याकडे येतील. काळजी करू नको.'

कालच केशवचा फोन आला होता. आता दोन दिवस तरी त्याचा फोन येणार नाही. त्याला कसं कळवायचं या विवंचनेत शारदा होती. दोन-तीन तास गेले आणि फोनची चिरपरिचित रिंग वाजली. शारदा धावतच गेली. केशवचाच फोन होता. तो म्हणाला, 'आई, कुसुमकडून मला सर्व समजले आहे. तू फक्त एक काम कर. हॉस्पिटलच्या लेटर-हेडवरचा फोन नंबर मला लगेच सांग.'

केशवने डॉक्टरशी संवाद साधल्यावर त्याला परिस्थितीचे गांभीर्य लक्षात आले. धावाधाव करून विमानाचं बुकिंग केलं. फोन झाल्यापासून ९ व्या दिवशी ते सर्वजण पुण्यात आले. गणेशची प्रकृती खूपच खालावली होती. दोन शब्द सलग बोलणंही शक्य होत नव्हतं. साऱ्यांच्याकडे पाहून तो भरल्या डोळ्यांनी तृप्तपणे हसत होता. ती रात्र कशीबशी पार पडली आणि पहाटे पाचच्या सुमारास गणेशची प्राणज्योत झोपेतच विझली.

देहाचा अग्निसंस्कार झाल्यानंतर अकरा दिवसांनी ज्यांना शक्य असेल त्यांनी मनापासून कुलदेवतेचे स्तोत्रपठण करावे आणि त्यानंतर शिऱ्याचा समावेश असलेले साधे नेहमीचे जेवण माझा आशीर्वादरूपी प्रसाद म्हणून ग्रहण करावे. ही गणेशची अंतिम इच्छा अमलात आणली गेली. फक्त शारदाने उदकशांतीचे आयोजन केले. या पूजेला किरण आणि उषा बसले. पूजेचं वस्त्र बदलून कपाटात ठेवतांना किरणला एक मोठे पाकिट दिसले. त्यावर 'मृत्युपत्र' असे लिहिले होते. उषाला - आपल्या पत्नीला हाक मारून २०-२५ ओळींचा तो कागद त्यांनी वाचला आणि तणतणतच बाहेर येऊन 'आम्हाला नको हा प्रसाद' म्हणत त्याने भरले ताट ढकलले. 'जिवंतपणी अन्याय आणि मृत्यूनंतरही बाबांनी माझ्यावर अन्यायच केला.'

किरणच्या हातातील मृत्युपत्राचा कागद पाहून शारदाच्या सर्व प्रकार लक्षात आला. डोळे पुसत, आवंढा गिळत त्या शांतपणे म्हणाल्या, 'अन्याय म्हणू नकोस. थोडे कमी जास्त केले आहे, पण त्याला कारण तू केशवला लिहिलेले पत्र, जे पत्र आम्हाला सामान आवरताना मिळालं, ते पत्रही त्या पाकिटातच आहे. ते पत्र मिळाल्यावर तुझ्या बाबांनी मृत्युपत्र बदलले.'

तुझ्या राजकीय कर्तृत्वाचा अंत आम्ही केला. उषाला आईवडील नाहीत, म्हणून भरपूर खर्च करून तुमचा विवाह आम्ही करून दिला. लग्नात उषाला माझेच बांगड्या, पोहे-हार आणि घरातील थोडे सोने वापरून मंगळसूत्र केलं. तर वडिलोपार्जित सोन्यातून आम्हाला बेदखल केले असं तुझं म्हणणं. पण माझ्या प्रत्येक नातीला तुझ्या तीन मुलींना-बारशाच्या वेळी एक तोळा सोने घातले. याचा उल्लेख केला नाहीस. प्रत्येक बाळंतपणावेळी माझ्या शारीरिक कष्टाबरोबर आर्थिक भारही आमच्यावर पडत होताच ना? तुझ्या लग्नात आणि त्यानंतर उषाच्या बाळंतपणावेळी तू उचलून पाच पैसे तरी दिलेस का? आणि वर माझ्या कोणत्याही मुलीचं बारसं आईबाबांनी दणक्यात केलं नाही हा तुझा शब्द.

केशवनं हे पत्र मुख्यत्वे आम्हाला दोघांना दीड-दोन वर्षे तुझ्याकडे ठेवण्यासाठी लिहिलं होतं. या निमित्तानं तू अनेक गोष्टी त्याला सांगितल्यास, पण कहर म्हणजे आम्हा दोघांना तुझ्याकडे ठेवण्यासाठी केशवनं आमच्यासाठी तुला कराव्या लागणाऱ्या खर्चाची रक्कम अंदाजे वीस ते पंचवीस हजार आधी तुझ्याकडे जमा करायची आणि त्यानंतर केशवनेच आम्हाला तुझ्या घरी सोडायचं हे वाचून तर आमच्या मनाला असह्य वेदना आणि दु:ख झालं. वेदनेचं रूपांतर संतापात झालं आणि मग त्यांनी ७५०० स्के.फूटाचा संपूर्ण प्लॉट केशवला दिला आणि माझ्यासाठी ठेवलेली रक्कम सोडून उरलेली रक्कम केवशला ६०% आणि तुला ४०% दिली. आणि एक तुला सांगते, पुण्याला आल्यापासून आम्ही थोडीही पदरमोड केली नाही. आमचा संपूर्ण खर्च केशव चालवतो.'

यावर किरण म्हणाला, 'बरं आता पुरे कर तुझं पुराण ! तुझा लाडका केशव निघून जाईल अमेरिकेला, मग रहा एकटी भुतासारखी या घरात ! मी तुला माझ्याकडे रहायला नक्कीच नेणार नाही !'


'वा! वा! किरण, हे ऐकून कान तृप्त झाले आणि तुला जन्म दिल्याचं सार्थक झालं. पण किरण, इथंही तुझ्या मनासारखं होणार नाही. कुसुमची मुलं, माझी नातवंडं शेखर आणि शिवानी या दोघांचीही पुण्यातल्या नामवंत कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून नेमणूक झाली आहे. ती दोघं माझ्याबरोबर याच फ्लॅटमध्ये राहाणार आहेत. पूर्वजन्मीचं वैर असं ऐकलं होतं, पण सौम्य प्रमाणात का होईना मला हे याच जन्मी अनुभवावं लागलं. हीच नियती. शेवटी एवढंच सांगते, अन्नानं भरलेलं हे ताट लाथाडू नकोस. त्यातला एक घास तरी खा. स्वत:च्या वागण्याकडे, प्रत्येक कृतीकडे अंतर्मुख होऊन पहा. तुझी चूक तुला उमजेल. मी तुझ्यावर रागावले नाही. रागावणार नाही. तुझ्या सुखी, समाधानी आयुष्या-साठी तुला एवढंच सांगेन, पैसा म्हणजे सर्वस्व हा तुझ्या मनाला झालेला भ्रम दूर कर. कधी काहीही अडचण आली तर या तुझ्या आईला हाक मार. मी शक्य असेल ते सारं करेन !

**– सौ. कमला हर्डीकर,**
मोबा. ९६८९३६९९२६

**सोने-चांदी मौल्यवान खरेदी !**
**गोखले ब्रदर्स**
**सराफी दुकान**
**सोमवार, दि. 10 : पुष्य नक्षत्र**
**आपलं दुकान**
**महाद्वार रोडवर,**
**0231-2546585**

**दिनविशेष (जून २०२४)**
**वैशाख-ज्येष्ठ १९४६**
**शोभननाम - क्रोधीनाम संवत्सरे**

**सौजन्य : श्री महालक्ष्मी दिनदर्शिका**
**श्री महालक्ष्मी दिनदर्शिका जिथे जिथे ।**
**साक्षात लक्ष्मी वसे तिथे ।**



**शनिवार दि. १ :** जागतिक पालक दिन, संत मुक्ताबाई पुण्यतिथी, **बुधवार दि. ५ :** अमावास्या, जागतिक पर्यावरण दिन, **गुरुवार दि. ६ :** शिवराज्याभिषेक सोहळा, श्री शनैश्चर जयंती, **रविवार दि. ९ :** महाराणा प्रताप जयंती, **सोमवार दि. १० :** जागतिक दृष्टिदान दिन, **मंगळवार दि. ११ :** श्री सानेगुरुजी स्मृतिदिन, **सोमवार दि. १७ :** राजमाता जिजाऊ स्मृतिदिन, **मंगळवार दि. १८ :** राणी लक्ष्मीबाई पुण्यदिन, **गुरुवार दि. २० :** शिवराज्याभिषेक दिन, **शुक्रवार दि. २१ :** वटपौर्णिमा, **शनिवार दि. २२ :** कर्नाटकी बेंदूर, **मंगळवार दि. २५ :** अंगारक संकष्ट चतुर्थी (चंद्रो. १०.२१), **बुधवार दि. २६ :** राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती, **शुक्रवार दि. २८ :** संत तुकाराम महाराज पालखी, **शनिवार दि. २९ :** संत ज्ञानेश्वर माऊली पालखी प्रस्थान, आळंदी.

# माझी बँकेतील मुशाफिरी

## (एका बँक अधिकाऱ्याचे विलक्षण अनुभव)

प्रत्येक चाकरमान्याच्या नोकरीमध्ये काही आव्हानाचा काळ असतोच. तसाच माझ्याबाबतही आव्हानाचा काळ आलाच ! एका अतिशय बदनाम शाखेमध्ये माझी बदली झाली. स्टाफ आणि कस्टमर दोघेही कुविख्यात होते. एकमेकांच्या हातात हात घालून चालत होते. 'एकमेका सहाय्य करू, अवघे धरू कुपंथ' असा प्रकार होता. कायदेकानू, नीतिनियम वगैरेंची कुणालाच फिकीर नव्हती. वरिष्ठांना सगळ्या गोष्टी माहित होत्या, पण शाखा खूप धंदा करत असल्यामुळे आणि मजबूत नफा कमवत असल्यामुळे ते कानाडोळा करत होते. धंद्याच्या दृष्टिकोनातून शाखा इतकी महत्त्वाची होती की शाखा आणि मुख्य कार्यालय यांच्यामध्ये नेहेमीच्या टेलिफोन लाईन व्यतिरिक्त हॉटलाइन सुद्धा होती, ताबडतोब आणि थेट संपर्क करण्यासाठी !

एक फसवणुकीचे मोठे प्रकरण घडले शाखेमध्ये. विद्यमान कर्मचाऱ्यांचा त्यात सहभाग होता अशी दाट शंका होती. त्यामुळे त्या सगळ्या लोकांना तेथून हलवण्यात आलेआणि माझी विदेश विनिमय विभाग प्रमुख म्हणून आणि इतर सगळ्या नवीन लोकांची माझे सहकारी म्हणून तेथे बदली करण्यात आली.

प्रथम आपण फसवणुकीच्या प्रकरणाबद्दल माहिती करून घेऊया. एका खातेदाराने, प्रत्यक्ष कुठलीच आयात न करता, आयातीची खोटी कागदपत्रे मागवून त्या आधारावर आमच्या शाखेतून परदेशी पैसे पाठवले होते. त्याकाळी विदेश विनिमय दर नियंत्रित असून या दराने फक्त बँकेतून विदेशी चलन मिळत असे, सरकारमान्य आयातीकरता, सरकारमान्य दराने आणि इतर सरकारमान्य विदेशी खर्चा करता, सरकार मान्य करेल तेवढे.

पण परदेशी जाणाऱ्या भारतीयांना मात्र अधिक विदेशी चलनाची जरुरी असे. कारण सरकार मंजूर करत असलेली रक्कम अगदी तुटपूंजी असे. म्हणून विदेशी चलनाचा काळा बाजार होत असे – नियंत्रित दराच्या दीडपट दराने ! त्यासाठी काही लोक अशाप्रकारे बोगस आयात दाखवून परदेशी पैसे पाठवत असत आणि दीडपट दराने हवाला पद्धतीने विकत असत. वरील प्रकरणी सक्तवसुली कार्यालया तर्फे (Enforcement Directorate) (ई.डी.) चौकशी चालू होती.

मी विदेश विनिमय विभागाचा प्रमुख असल्याने मलाच चौकशीला जावे लागे. ई.डी. च्या माणसांना बँकिंग व्यवहाराची तेवढी माहिती नसे. म्हणून हा व्यवहार कसा चालतो हे समजून घेण्याकरता मला ते वारंवार बोलावत असत. एकदा तिथे गेले की कमीतकमी तीन चार तास तरी जात असत. अर्थात तेवढ्या काळात मी शाखेतल्या कामाकरता उपलब्ध नसे. शाखा प्रमुखाला वाटू लागले की ईडीचे नाव घेऊन मी बँकेबाहेर वेळ काढत फिरत आहे, मजा मारतो आहे. मी कळकळीने सांगून सुद्धा त्याचा विश्वास बसेना. त्याने मला ईडीच्या ऑफिसमध्ये जायला मनाई केली.

एक दोन दिवस गेल्यावर मला फोन आला ईडीच्या ऑफिसमधून मी का नाही आलो हे विचारण्यासाठी. मी खरे कारण सांगितले. तो सरकारी अधिकारी काही बोलला नाही. पण दुसऱ्या दिवशी त्याने शाखाप्रमुखाच्या नावे समन्स पाठवले– सरकारी कामात अडथळा आणल्याबद्दल – बरोबर दोन पोलीस पाठवले होते, शाखा प्रमुखाला ताबडतोब घेऊन ई.डी. मध्ये हजर करण्यासाठी ! शाखा प्रमुखाची हबेलंडी उडाली. त्याने मला लगेचच त्या ऑफिसमध्ये पाठवले आणि त्यानंतर तेथे जाण्याला कधीही अटकाव केला नाही !

या शाखेमध्ये कामाचा धबडगा खूप मोठा होता. दररोज ९ ते१० तास मान मोडून काम करायला लागे. शिवाय सर्व स्टाफ नवीन होता. साहजिकच काम समजायला त्यांना वेळ लागत होता. परंतु

शांतपणे न चिडता वा रागावता मी त्यांना विश्वासात घेऊन, धीर देऊन काम समजावून सांगायला सुरुवात केली. हळूहळू सगळे कामात हुशार झाले. काम भराभर करू लागले. मग सगळे कामकाज सुरळीत सुरू झाले. त्याच बरोबर मी कामात शिस्त आणली. आवश्यक तेवढीच कागदपत्रे टेबलावर ठेवून, बाकीची कागदपत्रे ड्रॉवरमध्ये/ कपाटात/ कॅबिनेट-मध्ये ठेवायची हे सुरू केले. महत्वाची कागदपत्रे सेफमध्ये ठेवून सेफला चावी लावून चावी माझ्या ताब्यात घेतली. यामुळे अर्थातच कस्टमर,जे पूर्वी सर्व कागदपत्रे अनिर्बंधपणे हाताळत असत, ते पूर्णपणे बंद झाले. आणि माझा एक वचक निर्माण झाला.

आजकाल ऑफिसमध्ये ओली पार्टी ही एक संस्कृती झाली आहे. पण आमच्या शाखेमध्ये जवळजवळ दर दोन-तीन दिवसाआड अशी पार्टी होत असे. सगळ्यांशी संबंध राखायचे ह्या भावनेने, मी जरी पीत नसलो तरी या पार्ट्यांना हजेरी लावत असे. पण नंतर माझ्या लक्षात आले की सगळा खर्च कुठला न कुठला तरी खातेदार करत असे. तो फक्त पैसे देत असे, पण यजमान म्हणून कधीही हजर राहत नसे. मला ही गोष्ट खटकू लागली.

दुसऱ्याच्या जीवावर अशी मजा मारणे हे मला बिलकुल पसंत नव्हते. शिवाय अशाप्रकारे आपण पैसे घेतले तर थोड्यातरी उपकाराची भावना प्रायोजक खातेदाराबद्दल मनात निर्माण होतेच आणि मग त्याचे काम, प्राधान्याने करण्याचा आपला कल होतो. हे मला आवडत नव्हते.

मी मग आमच्या स्टाफची एक मीटिंग घेतली, म्हणालो, एकतर इतके वेळा ड्रिंक घेणे चांगले नाही. याचे पुढे व्यसनात रूपांतर होऊ शकते. शिवाय दुसऱ्याच्या पैशाने तर अशी मजा मारणे अगदी चुकीचे आहे. आपण वर्गणी काढून पार्टी करूया आणि आपल्या पैशाने पिऊया ! मी तरी आता पार्टीला हजर राहणार नाही. मी नाही म्हटल्यानंतर खातेदारांनी स्पॉन्सर करणे बंदच केले आणि या पार्ट्या आपसूकच थांबल्या ! आता खातेदारांना सुधारायचा प्रश्न होता.

सगळेच खातेदार पैशाचा कसा ढिला सोडत असत. पण नवीन स्टाफ बऱ्यापैकी प्रामाणिक होता आणि एकदा काम नीट समजल्यावर फटाफट वेळ न घालवता काम करत असे. त्यामुळे खातेदार खुश झाले की चिरीमिरी न देता त्यांची कामे वेळेवर होऊ लागली. पण एक कस्टमर मात्र अपवाद होता. त्याला त्याचे काम तर ताबडतोबच करून हवे असे, शिवाय नियम वाकवून ! त्याचा दबदबाही शाखेत आणि मुख्य कार्यालयात भरपूर होता. कारण कुठलीही मदत हवी असेल तर कुणीही त्याच्याकडे बिनदिक्कत जावे अशी परिस्थिती होती. कॅशिअरला पैसे शॉर्ट आले, हा माणूस पैसे भरणार. कुणाला गॅस कनेक्शन / टेलिफोन कनेक्शन हवे असेल हा त्याला मिळवून देणार. कुणाच्या मुलाला चांगल्या शाळेत प्रवेश पाहिजे असेल. हा पुढे येणार, इ. पण त्याची बँकेतील वागणूक मात्र सद्गृहस्थासारखी नव्हती. मला हे लक्षात आले की याला सरळ केले तर बाकी सगळेच- स्टाफ, इतर खातेदार, वरिष्ठ कार्यालय, शाखाप्रमुख सगळेच सरळ होणार ! मग मी ठरवले की ह्याला HED ON भिडायचे. एकतर हा तरी बदलेल नाहीतर मी तरी ! आणि मग सुरु झाली आमची लढाई ! हा सगळ्यांना अरेतुरे करायचा. मीही त्याला अरेतुरे करायला लागलो. हा चढ्या आवाजात बोलायचा. याबाबत मी सर्वांच्यासमोर त्याला समज दिली -

मी - अरे सद्गृहस्था, चढ्या आवाजात बोलायचे काम नाही. मी बहिरा नाही. हळू आवाजात बोलत जा.

कस्टमर - माझा आवाजच असा आहे!

मी - काय रे, बायकोशी बोलताना अशाच आवाजात बोलतोस का रे? नाही ना ? मग ? - तुला जमत नसेल तर तू माझ्याशी बोलतच जाऊ नकोस. तुझ्या नोकराला बोलायला सांग ! मी चढ्या आवाजातले चालवून घेणार नाही !

मी त्याच्याबाबत तर क्षुल्लक गोष्टी वगळता सगळे नियम काटेकोर पाळायचो. याला तर नियम पाळायचे माहीत नाही. दररोज खटके उडू लागले. एकदा चिडून त्याने माझ्याच टेबलावर बसून माझाच

टेलिफोन वापरून महाप्रबंधकांना फोन लावला, बोलू लागला, यहाँपे कौन गधा आपने रखा है? कुछ भी नही जानता ! खालीपिली नियम बताता रहता है?

पण माझे नाव ऐकल्यावर महाप्रबंधकाने फोन ठेवूनच दिला ! दुसऱ्या महाप्रबंधकानेही असेच केले. शेवटी कंटाळून हा जायला उठला. सगळा प्रकार माझ्यासमोरच चालू होता. मग मी त्याला म्हणालो, अरे बस, बस ! चेअरमननाही फोन ट्राय कर. पण सही मी करणार आहे आणि सर्व ओ. के. असल्याशिवाय मी सही करत नाही !

तो नाईलाजाने निमूटपणे निघून गेला. सर्व स्टाफ हा प्रसंग बघत होता . यानंतर स्टाफ माझ्या पूर्ण कन्ट्रोल मध्ये आला. हा माझ्यावर डूख धरून होता. एकदा त्याला संधी मिळाली आणि त्याने मला खिंडीत गाठले. त्याच्या वतीने एक इम्पोर्ट एल.सी. आम्ही उघडली होती. डॉक्युमेंट्स आली. काही क्षुल्लक त्रुटी होत्या. पण हा नेहेमीच अशी कागदपत्रे स्वीकारून पेमेंट करत असे. म्हणून आम्ही परदेशी बँकेला एल.सी. नुसार पैसे देऊन टाकले.पण याने हे बिल स्वीकारायला नकार दिला. मी विनंती केली, त्याने पैसे द्यायला नकार दिला. मी शाखा प्रमुखाला त्याच्यावर दबाव आणायला सांगितले, पण शाखा प्रमुखाने नकार दिला. हेड ऑफिसला विनंती केली, त्यांनी मध्ये पडायला नकार दिला, वर शहाजोगपणे सल्ला दिला, तू त्याच्याशी जमवून घे, पंगा घेऊ नकोस. आता स्पष्ट झाले की प्रकरण माझ्यावर चांगलेच शेकणार आहे.

मी शांतपणे विचार करायला सुरुवात केली. माझी तोपर्यंत ई.डी. च्या कार्यालयात चांगलीच घसट झाली होती. खरे बोलायचे तर त्यांच्याकडे केव्हाही जायला मला मुक्त द्वार होते, कुठलाच मज्जाव नव्हता. याचा मी फायदा घ्यायचा ठरवले. मी हेड ऑफिसच्या वरिष्ठांना सांगितले, 'ठीक आहे. तुम्ही बिलकुल मध्ये पडू नका. पण मी उद्या ई. डी.कडे जाऊन या माणसाच्या सगळ्या व्यवहाराची सर्व माहिती देणार आहे. मला या व्यवहारात त्रास होईल, त्याला पण सगळ्याच गोष्टींचा त्रास होईलच, बघूया पुढे काय होते ते! मी बिलकुल माझी मान झुकवणार नाही. माझी एवढी काहीच चूक झालेली नाहीये.

वरिष्ठ एकदम चरकले. शाखाप्रमुख हबकला. मी कुणाचेच काही ऐकणार नाही हे उघड होते. सगळ्यांना माझी ई. डी.कडे किती ओळख होती हे चांगलेच माहित होते. शाखाप्रमुखाला त्याच्यावर ई. डी. ने समन्स बजावल्याची गोष्ट माहीतच होती. वरिष्ठांनी आणि शाखाप्रमुखाने एकमेकांशी सल्लामसलत केली आणि आत्तापर्यंत जे सगळे हात झटकत होते, त्यांनी आपला पवित्रा एकदम बदलला. एकदम घूम जाव ! मला सांगू लागले, 'अरे तू तर आमचा माणूस आहेस. तुला हा त्रास देतो म्हणजे काय ? आम्ही त्याला सरळ करू. पैसे भरायला लावू. नाही भरले तर त्याचे सगळे व्यवहार बंद करू. पण तू ई.डी. कडे जाऊ नकोस !'

जणू काही जादूची कांडी फिरली. अर्थात कस्टमरने पैसे भरले, सरळ आला. त्यामुळे बाकीचे कस्टमरही सरळ झाले.

नंतर त्याने माझ्यावर सूड म्हणून त्याचे खाते, आमच्या दुसऱ्या शाखेला ट्रान्सफर केले. पण आमच्या इतकी उत्कृष्ट आणि जलद सेवा कुठलीच शाखा देत नव्हती आणि तो नाईलाजाने परतला.

जी आमची शाखा बदनाम म्हणून प्रसिद्ध होती, ती आता धंदा, व्यवस्थापन, कामकाज, नफा – या सर्व दृष्टीने उत्कृष्ट म्हणून प्रसिद्ध पावली !

येथे मला रामदास स्वामींचा एक श्लोक उद्धृत करावासा वाटतो,

ठकाशी असावे महाठक, उद्धटाशी उद्धट
नटखटाशी नटखट, झालेची पाहिजे।।

---

एल.सी. म्हणजे काय हे लेखांक चौथ्यामध्ये स्पष्ट केले आहे. थोडक्यात एल. सी. म्हणजे विक्रेत्याला ग्राहकाच्या बँकेने दिलेले हमीपत्र की त्यातल्या शर्ती नुसार जर त्याने ग्राहकाला माल पुरवला तर बँक त्याला पैसे देण्यास बांधील आहे.

शब्दांकन : **श्रीकांत शिंत्रे, सौ. ज्योत्स्ना शिंत्रे,**
मोबा. ९९२००५८७०५


# मुलांचे पान



## » चित्र रंगवा



## » फरक ओळखा




## » ठिपके जोडून चित्र तयार करा





शब्दप्रभुत्त्वाची साक्ष असलेल्या 'ज्ञानाच्या सोपानाची' जीवनगाथा

# ज्ञानसूर्याची सावली

## (लेखांक तेहत्तीसावा)

१२

सोपानाचं ब्रह्मरूप बघितल्यानंतर निवृत्ती, ज्ञानेश्वर आणि मुक्ता तिघांच्याही मनांत सोपानाबद्दल एक वेगळी आदराची भावना निर्माण झाली. ती त्यांच्या वागण्या-बोलण्यातून उद्धृत होऊ लागली आणि हेच नेमकं सोपानाला नको होतं. त्याच्या हृदयाची घुसमट व्हायला लागली. त्यातच या तिघांचं आपल्याशी असलेलं वागणं का बदललं, याचाही त्याला उलगडा होईना. 'आपण सोपान आहोत आणि निवृत्तीदादा आपल्याला शिष्य करून घेणार आहे, याबद्दल त्याला झालेल्या आनंदावर विरजण पडायला लागलं. काय करावं त्याला सुचेना. भोकाड पसरून रडावं, निवृत्तीदादाला जाऊन बिलगावं असं त्याला वाटायला लागलं. एक वेळ निवृत्तीदादाला बिलगणं शक्य होतं; पण भोकाड पसरून रडणं? छे: ! ते कदापि शक्य नाही. त्यातच मुक्तीसमोर तर नाहीच नाही.' सोपानाच्या मनाला या विचारांचे क्लेश होऊ लागले. 'आता काय केलं म्हणजे निवृत्ती-ज्ञानादादा पुन्हा आपल्याशी पूर्वीसारखे वागतील.' असा त्याला प्रश्न पडला.

त्या घटनेनंतर खरंतर ब्राह्ममुहूर्तावर गुरुगंडा बांधायचा होता, पण तो राहूनच गेला. त्यामुळेही सोपान उदास झाला. या विचारांच्या आवर्तानं त्याला काही सुचेना. त्याची तहान-भूक हरपली. तो कोणाशी बोलेना. निवृत्ती-ज्ञानेश्वर, मुक्तावरही अजूनही त्याच्या ब्रह्मदर्शनाचा प्रभाव होता. त्यामुळे ते तिघंही भारावलेलेच होते. त्यामुळे सोपानाची ही उदासीनता म्हणावी तेवढी प्रकर्षानं त्यांच्या लक्षात येत नव्हती. सोपान मात्र आतल्या आत घुसमटत होता, कोंडत होता. आणि ही कोंडी कशी फुटायची, या विचारानं आणखीच घायाळ होत होता; पण अचानक ही कोंडी फुटली.

एरवी हसत-खेळत होणारी दुपारची जेवणं आज शांतपणे चालली होती. पर्णावलीवर भात घेऊन माधुकरीत मिळालेली आमटी त्यावर घेऊन चौघं जण जेवत होती, मुकाटपणे ! एवढ्यात, ''बाळांनो, हैसा काय घरात?'' असा खणखणीत आवाजातला प्रश्न ऐकायला आला. चौघांचेही घास हातातच राहिले. डोळे विस्फारले गेले आणि ''भोजलिंग-काका?ऽऽ भोजलिंगकाकाऽऽऽ!'' असे ओरडत मुक्ती उठली आणि तिच्यापाठोपाठ ही तिघंही. झोपडीतून चौघंही धावत बाहेर आली. अंगणात भोजलिंगकाका उभे होते. मुक्ता-सोपान धावत जाऊन त्यांना बिलगले. निवृत्ती-ज्ञानेश्वर पुढे झाले. त्यांनी भोजलिंगकाकांचा हात धरला आणि अश्रूभरल्या डोळ्यांनी ते काकांकडे पाहू लागले. कितीतरी दिवसांनी, नव्हे कितीतरी महिन्यांनी भोजलिंगकाका भेटत होते.

विठ्ठलपंत-रुक्मिणीबाई यांना गावानं बहिष्कृत केल्यावर ते सिद्धबेटावर राहायला गेले. तिथे हे भोजलिंगकाका होते. या प्रेमळ, पापभीरू, सज्जन, सालस; पण विद्वान जोडप्याशी त्यांचा घरोबा झाला. समाजाच्या बहिष्काराची, ब्रह्मवृंदाच्या नाराजीची, पूर्वापार चालत आलेल्या धार्मिक रूढी-परंपरेची किंवा धर्मसभेची यत्किंचितही तमा न बाळगता भोजलिंगकाका या कुटुंबाचे सहोदर बनले. धाकट्या भावाला करावी, तशी मदत त्यांनी विठ्ठलपंतांना केली, तर लेकीचे लाड पुरवावेत, तसे रुक्मिणीबाईंचे डोहाळे पुरवले. हे भोजलिंगकाका जातीने सुतार होते. अत्यंत कुशल सुतार अशी त्यांची ख्याती होती. सिद्धबेटावर विठ्ठल पंतांसाठी पर्णकुटी बांधण्यापासून ते, ते असताना आणि नसतानाही त्या पर्णकुटीच्या देखभालीचं काम काका आत्मियतेनं करत असत. रुक्मिणीबाईंना

डोहाळे लागल्यावर तर लेकीचे लाड पुरवावेत, तसे त्यांनी रुक्मिणीचे लाड पुरवले. निवृत्ती, ज्ञानेश्वर, सोपान आणि मुक्ता यांच्या जन्मानंतर तर विठ्ठलपंत रुक्मिणीबाईंपेक्षा भोजलिंगकाकाच लेकुरवाळे झाले. मुक्ता-सोपान दोघं दोन खांद्यांवर, तर ज्ञानेश्वर पाठुंगळीला आणि निवृत्तीचं बोट धरून सिद्धबेटावर फिरणारी भोजलिंगकाकांची मूर्ती म्हणजे त्यांच्या काळजातल्या मायेच्या झऱ्याचं साक्षात रूप होतं. भरपूर उंचीचा, काळा, अंगापिंडाने मजबूत, कल्लेदार मिश्या राखणारा, डोईवर मुंडासं बांधणारा हा ओबडधोबड माणूस फणसासारखा होता. वरून काटेरी आणि आतून मधाळ. त्याच्या हृदयातला मधाळपणा या निरागस पोरांच्यावर तो उधळायचा, तर त्याचं वरचं काटेरी रूप समाजातल्या दुष्टाचार्यांसाठी होतं. विठ्ठलपंतांच्या कुटुंबाशी स्नेह ठेवण्यावरून काकांना कोणी छेडलंच, तर त्यांचं उत्तर ठरलेलं असे. ते म्हणत, ''मी हाडाचा सुतार हाय बाबा ! काळजाच्या करवतीनं लाकडं कापायचं माझं काम. मग करवतीखाली कधी सागवान येतंय, तर कधी बाभूळ; पर ही तर चंदनाचीच झाडं हायत बाबा ! यांचं रक्षण करायचं काम माझं. कितीतरी विषारी नाग या झाडांना विळखा घालून बसलेत; पण चंदनाच्या झाडांनी सुगंध द्यायचा आपला धर्म सोडल्याला न्हायी. मग मी माझा धर्म का सोडू? जोवर माझी करवत चाललीय ना, तोवर या झाडांना कुणीबी धक्का लावू शकणार न्हायी. कोणी आलाच, तर एकेकाला आडवा-उभा कापून काढीन!'' काकांच्या या बोलण्यावर कुणाकडे उत्तर नसायचं. बोलणारा निरुत्तर व्हायचा आणि निघून जायचा. काका पुन्हा या पोरांच्यात पोर व्हायचे. मग वसंत ऋतू आला की, पांगिऱ्याचे घोस काढून दे. पलाशाचे गुच्छ काढून दे, बहाव्याची झुंबरं काढून दे, असं चालायचं, तर ग्रीष्म ऋतूत तर फळांची रेलचेल. जांभळं, करवंदं, कच्च्या कैऱ्या, कोवळ्या चिंचा, अननसाचे गड्डे, चौघांना बरोबर घ्यायचं आणि त्यांचे लाड पुरवायचे.

कधीकधी विठ्ठलपंतांच्या घरी चूल पेटायची नाही. मग काका घरातून कोरडा शिधा आणून द्यायचे आणि या चारही लेकरांना आपल्या घरी घेऊन जायचे. तिथे मग काकूच्या हातच्या दशम्या, दही, लसणाची चटणी, करडईची भाजी असा फक्कड बेत व्हायचा. काका-काकू दोघंही प्रेमळ. वात्सल्याचे उमाळेच जणू; पण त्यांना मूलबाळ नव्हतं. मग काळजातली सगळी माया या चार पोरांच्यावर उधळली जायची. विठ्ठलपंत-रुक्मिणीबाई यांनी देह गंगार्पण केले. ते दुःख सहन न होऊन भोजलिंग-काकाही देवाच्या शोधात तीर्थयात्रेला गेले. आई-बाबांसारखाच हा दुसराही आधार गेला. यातून ही चार निरागस बालकं सावरली. त्यांनी आपापली जीवनरेखा निश्चित केली. आणि त्यावरून मार्गक्रमणा सुरू केली आणि आज, आता, अचानक भोजलिंग काका समोर उभे होते. चौघं जण अभावितपणे त्यांना बिलगली. काकांच्या डोळ्यांत अश्रूंचा महापूर होता, तर या चौघांच्या काळजात हुंदक्यांची आवर्तनं. बरीच आवर्तनं झाली. यातून प्रथम सावरले ते काकाच ! खांद्यावरच्या उपरण्यानं डोळे पुसून त्यांनी मुलांचेही डोळे पुसले. पण छेः ! मुलांचे डोळे पुन्हा पुन्हा भरून येत होते. कारण... कारण, आई-बाबा गेल्यापासून असं मायेनं जवळ घेणारं, पाठीवरून हात फिरवणारं आणि असं डोळे पुसणारं कुणी भेटलेलंच नव्हतं. काका डोळे पुसत होते, तरी पुन्हा पुन्हा या चौघांचे डोळे भरून येत होते. उपेक्षेचा दुःखाचा पहिला आवेग ओसरला आणि सगळे सावध झाले. काकांनी पुन्हा एकदा सगळ्यांना डोळे भरून पाहिलं. प्रेमानं सगळ्यांच्या चेहऱ्यांवरून, पाठीवरून हात फिरवला आणि निवृत्तीचा हात हातात घेऊन म्हणाले, ''निवृत्ती, लेकरा, मला माफी कर ! पर काय करू? तुमचे आई-बाबा गेले आणि मला सगळं जग जणू खायला उठलं ! मला काही भानच राहिलं नाही. मला लै म्हंजी लै राग आलावता. समद्यांचाच ! तुमच्या आई-बाबांनी खाली मान घालून गुमानपणं बळी जाणाऱ्या कोकरावानी आपले जीव दिले त्याचा ! अरे पोरांनो, तुमचा बा एवढा विद्वान; पर या धर्मसभेविरूद्ध त्यानं तोंड उघडलं

न्हायी त्याचा ! कसलंतरी कारण सांगून अधर्माची शिक्षा म्हणून देहान्त प्रायश्चित्त सांगणाऱ्या धर्मसभेचा! आणि ह्ये सगळे घडतंय ते चुकीचं घडतंय, हे ठाऊक असून आपण काही करू शकत न्हायी म्हणून स्वत:चा ! लै लै राग आला ! माझं डोकंच फिरलं आणि त्या तिरिमिरीत मी बी भाईर पडलो. भटकत ऱ्हायलो. तिकडे प्रयागला पन जाऊन आलो. डोकं ताळ्यावर आल्यावर तुमची याद आली. काय सांगू पोरांनो, तुमची याद आली आणि खाड्कन भानावर आलो. आपण कुठं पाहिजे हुतं आणि कुठं आहोत याचं भान आलं. लेकरांनो, मला माफी करा. तडक निगालो ते इथं आलो. पर जवा जवा मी तुमच्याजवळ पायजे हुतो तवा नव्हतो. माउली मला माफी करा !'' भोजलिंगकाका बोलत होते. धो-धो बोलत होते. कुणालाच काय बोलवं समजत नव्हतं. यातून सावध झाला तो सोपाना. म्हणाला, ''काका, वाईट वाटून घेऊ नका. हे खरं आहे, की आई-बाबा गेले, तेव्हा तुम्ही हवे होतात; पण... पण एकापरीनं नव्हतात ते बरंच होतं. आम्ही आपापलं जगायला लवकर शिकलो, तुमचा आधार घेत राहिलो असतो, तर कदाचित आताही आधारानंच उभं राहिलो असतो; पण नियतीच्या मनात तसं नसावं. म्हणूनच तुम्हाला आमच्यापासून दूर जायची बुद्धी झाली आणि आम्हाला स्वाधाराची. होय ना दादा?'' सोपानाचं बोलणं पटण्यासारखंच होतं. मुक्ता भोजलिंग-काकांना घेऊन झोपडीत आली. काकांची अनुभवी नजर सगळीकडे फिरत होती.

झोपडीत फारसं सामान नव्हतं. होतं ते, नीटनेटकं लावलेलं होतं. झोपडी स्वच्छ, नीट सारवलेली. एका कोपऱ्यात चूल, तिथं पितळेची आणि काही मातीची गाडगीमडकी. एका कोपऱ्यात गाडग्यांची उतरंड. खुंटीला माधुकरीच्या झोळ्या, एका नजरेत काकांनी सारं जोखलं. मग अचानक त्यांना काहीतरी आठवलं. ''पोरांनो, चला चला ! अरे, मी दशम्या बांधून आणल्यात. काकूनं करून दिल्यात. लसूण चटणी आहे. कुरडूची भाजी आहे. दही आहे. काकूनं मोठ्या मायेनं केलंय सगळं. काकूपण आता थकलीय. तुम्हाला जेवायला घालून लगोलग या म्हणलीय. चला उठा ! दशम्या खाऊ चला !'' काकांचं बोलणं ऐकून सगळ्यांचे डोळे पाणावले. 'खरंच, असं निर्व्याज प्रेम करणारी माणसं या पृथ्वीतलावर आहेत, म्हणूनच हे रहाटगाडगं नीट चाललंय !' ज्ञानेशाच्या मनात आलं ! मगाशी जेवणं अर्धवट झाली होती आणि आता तर आणखीच भूक लागली होती.

काकांनी बरोबर आणलेली शिदोरी सोडली. कुरडूच्या भाजीचा, लसूण चटणीचा वास साऱ्या झोपडीभर पसरला. त्यानं भूक आणखीच जागी केली. मुक्ता पुढे झाली. तिनं पर्णावली मांडल्या. काकांनी बांधून आणलेल्या दशम्या, चटणी, भाजी सगळ्यांच्या पानांत वाढली. सगळी पुन्हा जेवायला बसली. पोरं आवडीनं चवीनं जेवत होती. काका डोळे भरून बघत होते. ते बघूनच त्यांचं पोट भरलं. आज कितीतरी दिवसांनी असा मायेचा घास पोरांच्या तोंडात पडत होता. बघूनच डोळे निवले होते. डोळ्यांतलं समाधान मनात उरतलं होतं. मनातलं पोटात आणि पोरं त्या दशम्या खाऊन तृप्त झाली. उरलेल्या दशम्या तशाच बांधून मुक्तीनं शिबड्यात झाकून ठेवल्या. सगळी उठून काकांच्या पाया पडली. काकांनी पुन्हा एकदा सगळ्यांना जवळ घेतलं. त्यांच्या चेहऱ्यावरून, पाठीवरून, डोक्यांतून हात फिरवला. काकांचा हात तसाच खरखरीत होता. त्यांच्या व्यक्तित्वासारखा; पण त्या पाठीमागची माया मात्र कातळाखाली असलेल्या पाण्यासारखी होती. निर्मळ, पारदर्शी, मधूर आणि अविरत वाहणारी, काकांनी पोरांचा निरोप घेतला. पाय उचलवत नव्हते; पण आजारी काकूसाठी जाणं भाग होतं. अंगणातून एकवार पाठीमागे बघून काका झपझप निघालेसुद्धा. सोपानाच्या मनात आलं, 'आज पुन्हा एकदा पोरकं झालो आहोत असं वाटतंय!' (क्रमश:)

**- सौ. मंजुश्री गोखले,**
मो. ८८०५३५५२००

# सोपानदेवांची ‘अलौकिक सोपानदेवी’

ज्ञानेश्वरांनी श्रीमद्‌भगवद्‌गीतेवरील भाष्य ज्ञानेश्वरीद्वारा लिहून या महान ग्रंथराजाचा सर्वसामान्यांना परिचय करून दिला हे आपण जाणतो. मात्र ज्ञानेश्वरांपाठोपाठ त्यांचे धाकटे बंधू सोपानदेवांनीही अतिशय सोप्या भाषेत गीतेचा ओवीबद्ध अर्थ सांगितला आहे हे किती लोक जाणतात? गीतेच्या ७०० श्लोकांचे निरूपण ज्ञानदेवांनी सुमारे ९०३२ ओव्यांतून केले आहे. तर सोपानदेवांनी ते अवघ्या ७०४ ओव्यांतून आणि नागर मराठी भाषेत केले आहे. नवस्नेहच्या संपादिका सौ. मंजुश्री गोखले यांनी सोपानदेवी संपादित केली असून आपण ती क्रमश: वाचत आहोत. यात ठळक टाईपात सोपानदेवांची रचना असून त्याखाली विनोबांनी केलेली गीताईतील रचना दिली आहे. **– व्यवस्थापक**

**अध्याय ५ : कर्म संन्यास योग**

**तरी आतां ज्ञान अज्ञान । नासावें आपुले आपण ।**
**तैं अज्ञान जाय निरसोन ।**
**ज्ञान प्रकाशे सूर्याचे परी।।**
गेले अज्ञान तें ज्यांचें आत्म-ज्ञानें तयां मग ।
पर-ब्रह्म दिसे स्वच्छ जणूं सूर्ये प्रकाशिलें ।।१६।।

**त्याचे ठाई बुद्धि अंत:करण असे । आणि**
**पारायण असोनी निष्ठा दिसे । तयाचे पाप ज्ञाने**
**करूनी नासे । मोक्ष पावे निश्चयेसी ।।**
रंगले त्यांत ओतूनि बुद्धि निश्चय जीवन ।
पुन्हां येती न माघारे ज्ञानें पाप धुऊनियां ।।१७।।

**ब्राह्मण असे विद्यासंपन्न । त्यांसी नम्रता परिपूर्ण ।**
**तयासि गाई ब्राह्मण श्वान । चांडाळ तोहि सम देखे ।।**
विद्या-विनय-संपन्न द्विज गाय तसा गज ।
श्वान चांडाळ हे सारे तत्त्व-ज्ञ सम पाहती ।।१८।।

**इहलोकी तींही असता । स्वर्ग लोक जिंकिला**
**तत्त्वता । त्यासी समबुद्धि जाली निभ्रांता ।**
**तो निर्दोष ब्रह्मी स्थीर असे ।।**
इथें चि जिंकिला जन्म समत्वीं मन रोवुनी ।
निर्दोष सम जें ब्रह्म झाले तेथें चि ते स्थिर ।।१९।।

**बरवे प्राप्त जालिया संतोष नाही । वाईटाचे दु:ख न**
**पवे काही । ऐसे पुरुष असती पाही । ते निर्दोष ब्रह्मी**
**स्थीर होती ।।**
प्रिय-लाभें नको हर्ष नको उद्वेग अप्रियें ।
बुद्धि निश्चळ निर्मोह ब्रह्मीं ज्ञानी स्थिरावला ।।२०।।

**जो विषयासक्ति टाकोनी राहिला । आत्मसुख**
**जाणोनी स्थिरावला । तो ब्रह्मयोग पावला ।**
**मोक्ष सुख ।।**
विटला विषयीं जाणे अंतरीं सुख काय तें ।
ब्रह्मीं मिसळला तेव्हां भोगी ते सुख अक्षय ।।२१।।

**इंद्रिये संबंधे भोग होती । ते दु:खाची कारणे करिती ।**
**अर्जुना जे कां उपजोनी नाशिती ।**
**या कारणे ज्ञानी न धरिती सुख तेथे ।।**
विषयांतील जे भोग ते दु:खास चि कारण ।
येती जसे तसे जाती विवेकी न रमे तिथें ।।२२।।

**शरीर जोपर्यंत आहे । तोपर्यंत काम क्रोध साहे ।**
**तोचि योगी जाणावा पाहे । तोचि सुखी जाणिजे ।।**
प्रयत्नें मरणापूर्वी ह्या देहीं जिरवूं शके ।
काम-क्रोधांतले वेग तो योगी तो खरा सुखी ।।२३।।

**वाचकांनी आपले बदललेले पत्ते चित्पावन संघाच्या कार्यालयात किंवा ७६२०५४६२२५ या व्हॉटस् ॲप क्रमांकावर लौकरात लौकर पाठवावेत.**

# सप्त चिरंजीव (सत्य काय?)

*अश्वत्थामा बली व्यासो हनुमान बिभिषण: ।*
*कृप परशुरामस्य सप्तते चिरंजिवीना ।।*

संकलक – **अविनाश बर्वे**

कोणत्याही दंतकथेमध्ये काही तरी सत्य किंवा वस्तुस्थिती लपलेली असते, हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

**– सी. लिओनार्ड वूली**
ब्रिटिश पुरातत्वशास्त्रज्ञ

हिंदू धर्माचा मुख्य आधार, पाया म्हणजे वेद, उपनिषदे, पुराणे आणि आपली दोन महाकाव्ये, रामायण आणि महाभारत. महाभारतातील समाविष्ट असलेली भगवद्गीता. ह्या सर्व पायावरच हिंदू धर्माची इमारत आपल्या पूर्ण वैभवानिशी ठाम उभी आहे. या वैभवामध्ये असलेले हिंदू संस्कार, ज्ञान, तत्वज्ञान आणि मानवता हे समाविष्ट आहे. त्यानंतर येत असलेली आपली संत परंपरा. सर्व संतांनी या मानवतेचाच संस्कार हिंदूमनावर भक्तिमार्गावाटे करायचा प्रयत्न केला आहे. हे विश्वची माझे घर! हेच संतांचे ब्रीद होते.

या सगळ्या पार्श्वभूमीवर काही पुराणातल्या कथा आपल्याला वेगळ्या, अविश्वासार्ह वाटतात, गूढ वाटतात. त्यांना आपण एके काळी दैवी चमत्कार असे नाव देत असू. आज आपण त्यांना भाकड कथा म्हणतो.

काहीतरीच ! अशक्य ! असेच उदगार आपल्या तोंडून येतात. आपल्या पुढच्या पिढीतल्या प्रजेला तर नक्कीच या भाकडकथा वाटतील. परंतु त्या मागची खरी कथा, खरा विचार, खरे सत्य याचा धांडोळा घेण्याचा आपण कधी प्रयत्न केला आहे का?त्यामधील गुढार्थ – HIDDEN MENING – याचा आपण विचार केला आहे का? तर नक्कीच नाही. कारण मागच्या माणसांनी सांगितले तसेच स्वीकारायची माणसांची सहसा प्रवृत्ती असते. पण आजच्या विज्ञान युगातील पिढी या कथा जशाच्या तशा स्वीकारायला नकार देते आणि त्यातील सत्य, खरा अर्थ शोधण्याचे कष्ट आधीच्या पिढीने घेतलेले नसतात. त्यामुळे आमची मुले, नातवंडे, BULLSHIT असे म्हणून सोडून देतात. त्यामध्ये त्यांना रस वाटत नाही आणि त्यामुळेच त्यांचा हळूहळू हिंदूधर्माच्या परंपरांवरचा विश्वास नाहीसा होत आहे.

या पार्श्वभूमीवर आपल्या पुराणातील सप्तचिरंजीव या संकल्पनेचा विचार मी या लेखमालेत करायचा ठरविला आहे.

आपला हिंदूधर्म असं सांगतो – 'जातस्यही ध्रुवोरमृत्यू' म्हणजे जन्मलेल्या प्रत्येक सजीवाचा मृत्यू कधी ना कधी निश्चित आहे. मग या पार्श्वभूमीवर संपूर्ण हिंदूधर्माच्या इतिहासात, हजारो वर्षांच्या इतिहासात फक्त सातच व्यक्ती अमर कशा काय झाल्या? म्हणजे त्या सात व्यक्ती आजही आहेत का? त्यांच्या अस्तित्वाच्या खुणा आजही माणसाला सापडतात का? कुणी त्यांना भेटलं आहे का? त्यांच्या आजही अस्तित्वाचा ठोस पुरावा कोणाकडे आहे का ?

तर नाही. आजपर्यंत यांनी बघितलं, त्याला भेटला अशाच गोष्टी आपण ऐकत असतो. परंतु मी स्वतः एका चिरंजीव – अमर माणसाला भेटलो आहे, या एका निश्चित ठिकाणी तो रहातो, या एका ठिकाणी त्याचं घर आहे, तो अमुक अमुक गोष्टी खातो, तो हे कपडे घालतो , त्याचं व्यक्तिमत्व असं असं आहे, तो माझ्यापाशी असं असं बोलला, असं ठोस काही सांगणारी व्यक्ती मला तरी भेटलेली नाही. सांगणारा असंच सांगतो की, अश्वत्थामा त्या अमक्या

तमक्याच्या आजोबा पणजोबाला भेटला होता. त्याने त्यांच्याकडे डोक्यावरच्या जखमेसाठी तूप / लोणी मागितलं. ते दिल्यावर तो निघून गेला, माझ्या मागे येऊ नकोस असं सांगून. या आणि अशाच कथा आपण ऐकतो.

मग या अशा गोष्टी दंतकथा म्हणून आपण सोडून द्यायच्या की त्यामागील सत्य शोधण्याचा प्रयत्न करायचा ? जेव्हा सांगणारे सर्व जण काहीतरी संदिग्ध सांगत असतात, तेव्हा त्यामागील निखळ सत्य शोधायचा प्रयत्न, कमीत कमी आणि विचार तरी सुजाण सुज्ञ माणसांनी करायला हवा.

या भूमिकेतून मी ही लेखमाला 'सप्तचिरंजीव' आज लिहीत आहे. एक नम्र प्रयत्न माझ्या अल्पबुद्धीनुसार या अमरपणाचे सत्य शोधायचा माझा एक प्रयत्न आहे. कारण शेवटी प्रत्येक ऐकलेल्या गोष्टीमागे अनेक सत्य असू शकतात. म्हणतात ना – डोळे आणि कान याच्या मध्ये चार बोटांचे अंतर असतं !

स्वतःच्या डोळ्याने पाहिलं तर ते निखळ सत्य! बाकी सगळ्या ऐकीव सांगोवांगीच्या कथा ! कोर्टातल्या एखाद्या खटल्यात देखील विरूद्ध पार्टीचा वकील तुम्ही हा गुन्हा घडताना स्वतःच्या डोळ्यांनी पाहिला का? असाच प्रश्न विचारतात. ते याच कारणाने!

मग हजारो वर्षांपूर्वी घडलेल्या घटनांचा कुणी प्रत्यक्षदर्शी साक्षीदार कसा असेल? म्हणूनच या सप्त चिरंजीवांच्या दंतकथा मागचे सत्य शोधण्याचा माझा हा अल्पमती प्रयत्न आहे.

**– सौ. ज्योत्स्ना शिंत्रे,**

मोबा. ९९२००५८७०५

# साहित्यिकांची टोपण नावे (मागील अंकावरून)

७१. लोककवी श्री मनमोहन – मीनाक्षी दादरकर
७२. माधव ज्युलियन – माधव त्र्यंबक पटवर्धन
७३. माधवानुज – डॉ. काशिनाथ हरि मोडक
७४. मामा वरेरकर – भार्गव विठ्ठल वरेरकर
७५. मधू दारुवाला – म. पा. भावे
७६. रिमोद्स – आर. डी. खरोले
७७. मिलिंद माधव – कॅ मा. कृ. शिंदे
७८. मुक्ताबाई (संत) – मुक्ताबाई विठ्ठल कुलकर्णी
७९. मोरोपंत – मोरेश्वर रामचंद्र पराडकर
८०. मंडणमित्र – द. पा. खांबेटे
८१. यशवंत – यशवंत दिनकर पेंढारकर
८२. यशवंत दत्त – यशवंत दत्ताजी महाडिक
८३. रघुनाथ पंडित – रघुनाथ चंदावरकर
८४. रमाकांत नागावकर (गंधर्व) – बळवंत जनार्दन करंदीकर
८५. रसगंगाधर – गंगाधर कुलकर्णी
८६. राजा ठकार – नारायण गजानन आठवले
८७. राजा मंगळवेढेकर – वसंत नारायण मंगळवेढेकर
८८. राधारमण – कृष्ण पांडुरंग लिमये
८९. रा. म. शास्त्री – वि. ग. कानिटकर
९०. रुप – प्रल्हाद वडेर
९१. रे. टिळक – नारायण वामन टिळक
९२. लता जिंतूरकर – लक्ष्मीकांत तांबोळी
९३. लक्ष्मीनंदन – देवदत्त टिळक
९४. लोकहितवादी – गोपाळ हरि देशमुख
९५. वनमाळी – वा. गो. मायदेव
९६. वसंत बापट – विश्वनाथ वामन बापट
९७. वसंत सबनीस – रघुनाथ दामोदर सबनीस
९८. वामन पंडित – वामन नरहर शेष
९९. विजय मराठे – ना. वि. काकतकर
१००. विंदा करंदीकर – गोविंद विनायक करंदीकर
१०१. विनायक – विनायक जनार्दन करंदीकर
१०२. विनोबा – विनायक नरहर भावे
१०३. विभावरी शिरुरकर – मालतीबाई विश्राम बेडेकर
१०४. विष्णुदास – नरहर सदाशिव जोशी
१०५. शुद्धनिषाद– श्रीकांत केशव ठाकरे
१०६. वशा – वसंत हजरनीस
१०७. विष्णुबुवा ब्रम्हचारी – विष्णु भिकाजी गोखले

**(संकलित)**

# भारतीय संगीताची आवश्यकता

आपल्या मेंदूचे उजवा आणि डावा असे दोन भाग असतात. उजव्या मेंदूचे काम सर्जनशीलता, कला, अंतरज्ञान. डाव्या मेंदूचे काम कारणमिमांसा, निर्णयक्षमता, गणित, शास्त्र, पृथक्करण, भाषा, तर्क आणि रोजचे पूर्ण रुटीन. फक्त लहानपणीची काही वर्षे आपला उजवा मेंदू काम करतो, नंतर त्याचे हळूहळू काम करणे बंद होते. संगीत ऐकल्यामुळे उजव्या मेंदूतील १७ केंद्रे ॲक्टिव्हेट होतात.

संगीतोपचार म्हणजे उजव्या मेंदूचे अभ्यंग-स्नान. संगीत उपचारांमध्ये संगीत हे माध्यम असते. आपल्या शरीरातील एकूण एनर्जी च्या २५ टक्के एनर्जी मेंदूला आवश्यक असते. बाकी शरीरासाठी आपण पौष्टिक आहार घेतो, व्यायाम करतो. परंतु शरीराच्या प्रत्येक क्रियेसाठी जबाबदार असलेल्या मेंदूसाठी अक्षरशः काहीच करत नाही. संगीत उपचाराचे कोणतेही दुष्परिणाम नाहीत. आपण कमी जास्त प्रमाणात डाव्या मेंदूच्या अधिपत्याखली असतो. संगीतोपचारा मुळे मेंदूच्या उजव्या भागातील केंद्र ॲक्टिव्हेट केली जातात जे खूप जरुरी आहे. म्हणून रोज वीस मिनिटे तरी संगीत ऐकावे. संगीताच्या माध्यमातून ब्रेन प्रोग्रामिंग होते, त्याप्रमाणे भावना बनतात.

**संगीताचे फायदे-**

१) संप्रेषण कौशल्य (कम्युनिकेशन स्किल) सुधारते. २) स्मरणशक्ती मध्ये वाढ होते. संगीताची मेमरी स्ट्राँग आहे, विशिष्ट संगीताच्या साह्याने त्या वेळची परिस्थिती आठवते. ३) एकाग्रता वाढते. ४) रागावर नियंत्रण ठेवता येते. ५) शारीरिक वेदना वर नियंत्रण ठेवता येते. ६) ताण तणावावर नियंत्रण ठेवता येते. ७) स्ट्रेस हार्मोनची पातळी योग्य प्रमाणात राखण्यास मदत होते. वाद्य वाजवताना बोटांच्या हालचाली मेंदूसाठी उत्तम असतात.

**गाणे म्हणणे का जरुरी आहे-**

संगीताचा उगम कला म्हणून झाला नसून, भावनांचे प्रकटीकरण करण्यासाठी झाला आहे. ५% लोक संगीत तयार करतात व ९५% लोक त्याचा आनंद घेतात. हे कला म्हणून ठीक आहे. आपल्याला लोक नावे ठेवतील ही गोष्ट मनातून काढून टाकून प्रत्येकाने फ्रीली येईल तसे गायले पाहिजे.

ओरिजिनल गाणे ऐकून तेच गाणे स्वतः म्हणण्याचा प्रयत्न करणे, या प्रयत्नाला आपला मेंदू सर्वात जास्त सकारात्मक प्रतिसाद देतो. मोठ्यांनी गाण्याचा प्रयत्न केला, तर लहान मुले व तरुण मंडळी सुध्दा गाण्याचा प्रयत्न करतील व त्याचा सकारात्मक परिणाम सर्वांनाच होईल. पटकन मूड चेंज होण्यासाठी तरुण वयात आपण जी गाणी ऐकत होतो, त्याच पद्धतीची किंवा तीच गाणी ऐकावीत. संगीताचा कोणताही साईड इफेक्ट नाही. संगीत हे मानवासाठी वरदानच आहे.

**- अमर जांभळे,**
(गव्हर्मेंट ऑफ इंडिया सर्टिफाईड संगीतोपचार तज्ञ)
गडहिंग्लज, कोल्हापूर.

**कोल्हापूर चित्पावन संघासाठी आपल्या ठेवीची/वर्गणीची रक्कम**
**बँक ऑफ महाराष्ट्र, महाद्वार रोड शाखा**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**खाते क्र. 20128506183)**
**IFSC Code : MAHB0000326**
**येथे पाठवा व KYC पाठवा. किंवा**
**बँक ऑफ इंडिया, शाखा : महाद्वार रोड,**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**खाते क्र. 090210110016181)**
**IFSC Code : BKID0000902**
**येथे रक्कम पाठवून KYC पाठवा.**

**'नवस्नेह' च्या माध्यमातून आपल्या पाल्याचे विवाह जुळल्यास पालकांनी कृपया याची माहिती कोल्हापूर चित्पावन संघास कळवावी, ही नम्र विनंती.**



# मुस्लिम स्त्री कलाकार सुरैय्या

सुरैय्या या सुप्रसिद्ध अभिनेत्रीचा व पार्श्वगायिकेचा जन्म १५ जून १९२९ साली लाहोर येथे झाला. वयाचे एक वर्ष पूर्ण होत असतानाच तिचे कुटुंब मुंबई येथे आले. सुरैय्याने एकंदर ७० सिनेमात काम केले आहे आणि तिने गायलेल्या गाण्यांची संख्या ३३८ एवढी आहे.

१९३६ ते १९६४ या तिच्या २८ वर्षांच्या कारकीर्दीत तिने हिंदी चित्रपटसृष्टीवर अधिराज्य गाजवले. १९४० च्या आणि १९५० च्या दशकातील ती एक प्रसिद्ध गायिका व अभिनेत्री होती. त्या काळात ती पुरुष अभिनेत्यांपेक्षा जास्त पैसे घेत होती.

तिच्या सौंदर्याबद्दल तर बोलायलाच नको. तिचे डोळे, नाक व ओठ हुबेहुब मधुबालासारखे होते. ती फक्त बारा वर्षांची असताना तिने 'नई दुनिया' या सिनेमात पहिले गाणे म्हटले. हा सिनेमा १९४२ साली आला. 'मॅडम फॅशन' या १९३६ साली आलेल्या सिनेमात ती पहिल्यांदा बाल-कलाकार म्हणून चमकली. मॅडम फॅशन हा सिनेमा जद्दनबाई यांनी दिग्दर्शित केला होता. जद्दनबाई म्हणजे नर्गिसची आई. सुरैयाच्या जीवनाला कलाटणी मिळाली ती १९४१ साली.

जे बी पेटीट हायस्कूल या फोर्टमधील शाळेत ती शिकत होती. ती मरीन ड्राइववर 'कृष्ण महल' या बिल्डिंगमध्ये एका फ्लॅटमध्ये राहत होती. तिथेच नंतर तिचा मामा म्हणजे एम. झहूर राहायला आला. शाळेला सुट्टी पडलेली असताना तिचा मामा सुरैय्याला घेऊन ताजमहाल सिनेमाचे शूटिंग बघायला गेला. ताजमहाल हा सिनेमा नानूभाई वकील यांनी दिग्दर्शित केला होता. सुरैय्याला नानूभाई यांनी बघितले आणि ते आश्चर्यचकित झाले. आणि तिथेच त्यांनी तिला ताजमहाल मध्ये 'मुमताज महल' हा रोल दिला आणि तेव्हापासूनच तिची खरी कारकीर्द सुरू झाली.

मरीन लाईन्स इथे राहत असताना सुरैय्या बाल कलाकारांच्या ऑल इंडिया रेडिओवरील प्रोग्राम मध्ये सहभागी होत असे. तिथे ती गाणी म्हणत असे त्यावेळी राज कपूर व मदन मोहन हेही तिच्याबरोबर गाणी म्हणायला असायचे.

माझ्या मिसेसचे ऑफीस 'कृष्ण महल' मधेच होते. त्यांचा एक स्टाफ सुरैय्याकडे कामानिमित्त जात असे. तो सांगायचा काय केस आहेत सुरैय्याचे. लांब सडक व काळेभोर.

'इशारा', 'तदबीर', 'फूल', 'अनमोल घडी', 'उमर खय्याम', 'परवाना', 'दर्द', 'दास्तान', 'अफसर' अशासारख्या चित्रपटांमुळे ती टॉपची अभिनेत्री गणली जाऊ लागली.

सुरैय्या ही मलिका-ए-हुस्न (Queen of beauty) व मलिका-ए-अदाकारी (Queen of action) अशा नावानी प्रसिद्ध झाली.

१९४८ व १९४९ या दोन वर्षात 'विद्या', 'प्यार की जीत', 'बडी बहेन' व 'दिल्लगी' हे तिचे ४ चित्रपट असे काही गाजले की ती चित्रपटसृष्टीच्या अत्युच्च शिखरावर जाऊन पोचली.

'मिर्झा गालिब' या चित्रपटातील तिच्या कामाचे भारताच्या पंतप्रधानांनी भरभरून कौतुक केले.

चित्रपटसृष्टीत अभिनय करत असतानाच देव

आनंद व सुरैय्या एकमेकांकडे आकृष्ट झाले.

'विद्या' या सिनेमाच्या शूटिंगच्या वेळची गोष्ट. देव व सुरैय्या यांचा बोटीत एक शॉट सुरू होता. तेवढ्यात बोट कलंडली व सुरैय्या पाण्यात पडली. त्यावेळेस देव आनंदने तिला बुडण्यापासून वाचवले. त्यांचे खरोखरच एकमेकांवर प्रेम होते. ती दोघं लग्नही करणार होती, परंतु सुरैय्याच्या घरातील लोकांचा कडवा विरोध होता. कारण सुरैय्या मुस्लिम व देव आनंद हिंदू. यामुळे त्यांचे लग्न झाले नाही. पण सुरैय्या देव आनंदला विसरू शकत नव्हती. म्हणून ती आयुष्यभर अविवाहित राहिली.

देव व सुरैय्या यांच्या लग्नाला सुरैय्याच्या आजीचा विरोध होता. परंतु सुरैय्याची आई तसा विरोध करत नव्हती.परंतु आजीच्या पुढे सुरैय्याचे काही चालले नाही. त्यांचं प्रेम असताना ती राजरोसपणे एकमेकाला भेटू शकत नव्हती. त्यामुळे देवानंद सुरैय्याला तिच्या बिल्डिंगच्या टेरेसवर भेटत असे आणि त्यावेळी देवानंदचा मित्र सुरैय्याच्या आजीबरोबर गप्पा मारत असे व तिला गुंतवून ठेवत असे.

सुरैय्याच्या आईने नंतर एकदा शेवटची मीटिंग ठरवली. त्यावेळी देवानंदला वाटले की आपल्यासाठी एखादा सापळा रचलेला असणार. म्हणून तो आपल्या एका इन्स्पेक्टर मित्राला सुरैय्याला भेटण्यासाठी बरोबर घेऊन गेला. परंतु प्रत्यक्षात तसं काही नव्हतं. सुरैयाच्या बिल्डिंगच्या टेरेसवर त्या दोघांची शेवटची भेट झाली आणि ती दोघही एकमेकांच्या आयुष्यातून बाजूला झाली.

त्यानंतर सुरैय्याने कधीच लग्नाचा विचार केला नाही. तिला लग्न करणे शक्य होते. कारण तिच्याकडे पैसा, सौंदर्य, प्रसिद्धी सर्वकाही होते. तरीही ती आयुष्यभर अविवाहित राहिली व प्रेमाखातर सगळ्याचा त्याग केला.

सुरैय्याची काही गाजलेली गाणी खाली देत आहे.

१. ए शमा तू बता (दास्तान)
२. धडकते दिल की तमन्ना (शमा)
३. तू मेरा चांद मै तेरी चांदनी (दिल्लगी)
४. दिले नादान तुझे हुआ क्या है (मिर्झा गालिब)
५. ओ दूर जानेवाले वादा ना भूल जाना (प्यार की जीत)
६. वो पास रहे या दूर रहे ( बडी बहेन)
७. आपसे प्यार हो जाता है (शमा)
८. तेरे नयनोने चोरी किया ( प्यार की जीत)
९. बिगडी बनानेवाले ( बडी बहेन)
१०. ये कैसी अजब दास्तान हो गयी है (रुस्तुम सोहराब)
११. मुरलीवाले मुरली बजा (दिल्लगी)
१२. मन लेता है अंगडाई ( अनमोल घडी )
१३. तरा री आरा री सावन रुत तुम और हम (दास्तान)

अशी ही अभिनेत्री व गायिका ३१ जानेवारी २००४ रोजी मुंबई येथे स्वर्गवासी झाली.

**– प्रकाश गणेश गानू.**

मोबा. ९४२१९२९८४७

**योगवर्गाचे आयोजन**

शिवाजी पेठ, मंगळवार पेठ, महाद्वार रोड, अंबाबाई मंदिर परिसरातील नागरिकांसाठी योग विद्याधाम, कोल्हापूर आणि कोल्हापूर चित्पावन संघ यांचे संयुक्त सहकार्याने कोल्हापूर चित्पावन संघ हॉल, गुरुमहाराज वाड्यानजीक, मिरजकर तिकटी, कोल्हापूर येथे रोज सकाळी ६ ते ८ या वेळेत योगासन वर्ग सुरू झाले आहेत. तरी इच्छुक योगसाधकांनी सदर वर्गाचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी खालील नंबरवर संपर्क साधावा.

**सौ. सिद्धी बकरे – 8275606627,**

**श्री. रोहित गवळी – 9657963475**

# बंगालचे लोकमान्य टिळक

# सखाराम गणेश देऊसकर



देऊसकरांच्या प्रति कृतज्ञता ओंजळ !

मराठ्यांची उत्तरेत घोडदौड सुरू झाली. महादजी शिंदे, मल्हारराव होळकर, गोविंदपंत बुंदेले, झांशीचे नेवाळकर, धारचे पवार अशा सरदारांनी उत्तरेस राजसत्ता स्थापन केल्या आणि कोकणातील अनेक घराणी उत्तरेला गेली; यातच होते रामकृष्ण रायकर ! ते पेशव्यांचे आश्रित होते. त्यांच्यावर मर्जी बसल्याने बिहार राज्यात आज झारखंड येथे त्यांना करौ या गावची जहागिरी मिळाली होती. रामकृष्ण रायकरांची बहीण ही सखाराम गणेश देऊसकरांची आजी. करौ या गावी १७ डिसेंबर १८६९ रोजी त्यांचा जन्म झाला. मौंजी बंधनानंतर त्यांनी तत्कालीन प्रथेप्रमाणे बनारस इथे वेदाध्यायन केले व पुढे देवघर या जिल्ह्याच्या ठिकाणी शिक्षण घेऊन मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. पुढे ते ज्या शाळेत शिकले तिथेच शिक्षक म्हणून नोकरीला लागले. थोड्याच दिवसांत एक विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून त्यांची प्रसिद्धी झाली. देवघरला असताना योगी अरविंद यांचे आजोबा राजनारायण बोस यांच्याशी त्यांचा परिचय झाला आणि क्रांतिकार्याकडे मन ओढ घेऊ लागले. बंगाली क्रांतिकारकांशी संपर्क सुरू झाला. बाहेर हिंदी वातावरण आणि बंगाली क्रांतिवीरांचा वावर असला तरी घरी मराठी भाषा आणि संस्कृती नित्य नांदत होती. स्वाभाविकच लोकमान्य टिळक आणि त्यांच्या कार्याबद्दल नितांत आदर असल्यामुळे मनोमन त्यांनी लोकमान्यांना गुरू मानले होते. शिक्षक म्हणून कार्य करत असतानाच बंगालमधल्या विविध वृत्तपत्रांतून सामाजिक साहित्यिक आणि राजकीय विषयांवर लेख लिहित होते.

देवघर इथे हार्ड या नावाचा एक इंग्रज अधिकारी होता. त्याच्या अन्यायी कृत्यांचा निषेध करणारा एक लेख देऊसकरांनी हितवादी नावाच्या वृत्तपत्रात लिहिला. भडकलेल्या हार्डने त्यांना शिक्षकाच्या नोकरीवरून काढून टाकण्याची धमकी दिली; स्वाभिमानी असलेल्या देऊसकरांनी नोकरीचा राजीनामा दिला आणि कलकत्त्याला प्रयाण केले. हितवादीमध्ये मुद्रितशोधाचे काम करायला सुरुवात केली. लवकरच आपल्या कर्तृत्त्वाने ते हितवादीचे संपादक झाले. पुढे

आजच्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी तालुक्यातल्या साटेली गावात देऊसकरांची घरे असलेली देऊसवाडी आहे. या वाडीतून झारखंड प्रांतातल्या करौ गावी गेलेल्या गणेश सदाशिव देऊसकरांचे चिरंजीव सखाराम गणेश देऊसकर ! ज्यांनी बंगालमध्ये जाऊन बंगाली भाषेत साहित्य निर्मिती केली. लोकमान्य टिळकांचे अनुयायी म्हणून बांगलावासी त्यांचा बंगालचे लोकमान्य टिळक असा गौरवाने उल्लेख करतात. योगी अरविंद म्हणतात, देऊसकरांच्या देशेर कथा पुस्तकातून या देशाला पहिल्यांदा स्वराज्य हा शब्द मिळाला. ज्यांच्या नावाने कलकत्त्यात 'सखाराम गणेश देऊसकर सारणी' असे एका रस्त्याला नाव दिले आहे. करौ गावी त्यांच्या नावाने शाळा चालविली जाते आहे. माखनलाल चतुर्वेदींसारख्या नामवंत लेखकाला ज्यांनी देशप्रेमाची प्रतिज्ञा दिली, त्या सखराम गणेश देऊसकरांची ओळखही आम्हाला नाही. २०१९ साली त्यांच्या जन्माला दिडशे वर्षे झाली. बंगाल आणि झारखंड राज्यात मोठ्या उत्साहात शतकोत्तर सुवर्णमहोत्सव झाला, पण महाराष्ट्रात दिडशे शब्दही लिहिले गेले नाहीत, त्या क्रांतिवीर साहित्यिक सखाराम गणेश

कलकत्त्याच्या सार्वजनिक कार्यात हिरिरीने सहभागी झाले.

महाराष्ट्र आणि बंगाल हे दोन्ही प्रांत स्वातंत्र्य आंदोलनात अग्रेसर होते. महाराष्ट्राप्रमाणेच क्रांतिकारकांची मोठी फौज बंगालमध्ये इंग्रजांविरूद्ध सशस्त्र क्रांतीसाठी लढत होती. देऊसकरांनी या दोन प्रांतांना जोडण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांचा उत्सव करायला सुरुवात केली. ४ जून, १९०३ रोजी त्यांनी स्वामी विवेकानंदांच्या शिष्या भगिनी निवेदिता यांच्या सहकार्याने उत्सवाला प्रारंभ केला. त्यासाठी महाराष्ट्रातून लोकमान्य टिळक, डॉ. मुंजे तसेच बंगालचे नेते बिपिनचंद्र पाल यांना आमंत्रित केले. रविंद्रनाथ टागोर यांच्याकडून शिवाजी महाराजांवर कविता लिहून घेतली आणि मोठ्या उत्साहाने उत्सव साजरा केला.

लॉर्ड कर्झनने बंगालच्या फाळणीचा निर्णय घेतला आणि १९०५ साली बंगाल पेटून उठला. मुस्लीम बहुल भाग आणि दुसरा हिंदूबहुल अशी धार्मिक विभागणी करून बंगालमधील समाजात धार्मिक द्वेषाची ठिणगी पडेल या अत्यंत घातकी विचारांनी कर्झनने फाळणी करण्याचा निर्णय घेतला. याला डाक्याच्या नबाबाने पाठिंबा दिला. मात्र दोन्ही समाजांनी एकत्र येऊन फाळणीला विरोध सुरू केला. बंगालच नव्हे, तर साऱ्या देशभर या आंदोलनाचे पडसाद उमटले. देऊसकर या आंदोलनात सहभागी झाले. अखेर इंग्रज सत्तेला १९११ साली बंगालची फाळणी रद्द करण्याची नामुष्की पदरी आली.

१९११ साली जरी बंगालची फाळणी रद्द झाली तरी १९४७ देशाचे विभाजन झाले आणि बंगालचीही फाळणी होऊन पूर्व बंगाल आणि पश्चिम बंगाल असे तुकडे झाले आणि कर्झनचे स्वप्न दुर्दैवाने पुरे झाले.

२६ डिसेंबर, १९०७ रोजी सुरत येथे काँग्रेसचे अधिवेशन झाले. या अधिवेशनात काँग्रेसमधील जहाल आणि मवाळ अशा दोन गटांत प्रचंड संघर्ष झाला. जहालांचे नेतृत्व पंजाब केसरी लाला लजपतराय, लोकमान्य टिळक आणि बंगसुत बिपिनचंद्र पाल यांनी केले, तर तर मवाळांचे नेतृत्व गोपाळकृष्ण गोखले आणि रासबिहारी घोष यांचे होते. देऊसकर हितवादीचे संपादक होते. हितवादीच्या संचालकांचा मवाळांना पाठिंबा होता. त्यांनी देऊसकरांना हितवादीमध्ये लोकमान्य टिळकांविरूद्ध अग्रलेख लिहायला सांगितले. स्वाभिमानी देऊसकरांनी नकार दिला आणि हितवादीच्या संपदकपदाचा राजीनामा देऊन बाहेर पडले. त्यानंतर कलकत्त्याच्या बेंगॉल नॅशनल कॉलेजमध्ये ते बंगाल भाषेचे प्राध्यापक आणि तेही बंगाल प्रांतात होते. यावरूनच देऊसकरांच्या बंगाली भाषेवरील प्रभुत्वाचा प्रत्यय येतो.

कलकत्त्यात त्यांनी बुद्धिवर्धिनी सभा स्थापन केली; या सभेचे अध्यक्षपदही स्वीकारले. हे सर्व व्याप सुरू असताना त्यांची साहित्य निर्मितीही अखंडपणे सुरू होती. त्यांनी लिहिलेले देशेर कथा हे पुस्तक प्रचंड गाजले. दादाभाई नौरोजी आणि रमेशचंद्र दत्त यांनी पाश्चात्त्य लोक भारतीय अर्थव्यवस्थेचे कसे शोषण करत आहेत, हे सप्रमाण दाखविले. देऊसकरांनी तोच आधार घेऊन देशेर कथा लिहिली. १९०४ साली हे पुस्तक प्रकाशित झाले आणि पुढे पाच वर्षांतच पाच आवृत्त्या निघाल्या. त्याकाळात या पुस्तकाच्या तीन हजार प्रती विकल्या गेल्या. इंग्रज सरकार भारतीयांची कशी आणि किती लूट करते आहे हे त्यांनी या पुस्तकात लिहिले होते. पुढे या पुस्तकाचा हिंदी अनुवाद देशकी बात या शीर्षकाने बाबूराव पराडकर यांनी प्रसिद्ध केला. योगी अरविंद यांनी देशेर कथा मधून पहिल्यांदा स्वराज्य हा शब्द आला असे म्हटले आहे. त्यांच्या एकूण बारा पुस्तकांपैकी आठ पुस्तके महाराष्ट्रातील इतिहासप्रसिद्ध व्यक्तींवर लिहिलेली आहेत. शिवाजी महाराज, बाजीराव पेशवे, झांशीचा राजकुमार, महामती रानडे इत्यादींवर ही पुस्तके आहेत. १९१० साली इंग्रज सरकारने त्यांच्या देशेर कथा या पुस्तकांवर बंदी आणली आणि आपल्यामुळे अन्य प्राध्यापकांना त्याची झळ लागू नये म्हणून देऊसकरांनी प्राध्यापकपदाचा राजीनामा दिला. स्वातंत्र्य आंदोलनातील अनेक नेत्यांना देऊसकरांचे घर आश्रयस्थान असे. योगी अरविंद घोष त्यांच्या घरी येत असत. स्वदेशी वस्तू वापरण्याबाबत ते आग्रही होते. १९१० साली पत्नी आणि पुत्राच्या निधनाने अस्वस्थ होऊन देऊसकर आपल्या जन्मगावी कारौला परत आले आणि वयाच्या अवघ्या त्रेचाळिसाव्या वर्षी २३ नोव्हेंबर, १९१२ रोजी निधन पावले.

**– प्रकाश देशपांडे**

मोबा. ९४२३३८३१६६८

# समस्त ब्राह्मण समाजातर्फे
# भगवान श्री परशुराम जयंती निमित्त आयोजित भव्य शोभायात्रा






टाळ-मृदंगाच्या तालात आणि भगवान श्री परशुराम यांच्या जयघोषात श्री परशुराम जयंती निमित्त शुक्रवार, दि. १० रोजी सायंकाळी समस्त ब्राह्मण समाजाच्या वतीने शोभायात्रा काढण्यात आली. भगव्या टोप्या परिधान केलेले हजारो ज्ञाती बांधव आणि भगिनी पुरोहितांकडून सुरू असलेले सातत्यपूर्ण मंत्रोच्चार अशा भारावलेल्या वातावरणात झालेल्या या शोभायात्रेला उत्तम प्रतिसाद मिळाला. जिल्हा पोलीस अधिक्षक श्री. महेंद्र पंडित यांच्या उपस्थितीत पेटाळा मैदानावरून शोभायात्रेला सुरुवात झाली.

शोभायात्रेत अश्वारूढ छत्रपती शिवाजी महाराज सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. श्रीराम, सीता, लक्ष्मण, बाजीराव पेशवे, राणी लक्ष्मीबाई यांच्या सजीव देखाव्यांचाही शोभायात्रेत समावेश होता. महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्यापासून ते सचिन तेंडूलकर यांच्यापर्यंत ब्राह्मण समाजातील सर्व क्षेत्रातील कर्तबगारांचे फलक लक्ष वेधून घेत होते.

ही शोभायात्रा महाद्वार रोड, ताराबाई रोड, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून पुन्हा पेटाळा मैदानावर आली. याठिकाणी सायंकाळी ६ वा. ५५ मि. श्रींचा पाळणा सोहळा, सुंठवडा वाटप करण्यात आले. प्रसाद निगुडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पौरोहित्य करण्यात आले. नंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. सकाळी कात्यायनी परिसरातील श्री परशुराम मंदिरात अभिषेक करण्यात आला. शहरातील १६ ब्राह्मण संघटनांनी या शोभायात्रेचे आयोजन केले होते. यावेळी संतोष कोडोलीकर, वृषाली कुलकर्णी, श्रीकांत लिमये, मकरंद करंदीकर, प्रसाद भिडे, केदार जोशी, धर्मराज पंडित, मिलींद पावनगडकर, सचिन जनवाडकर, शामराव जोशी, महालक्ष्मी बँकेचे अध्यक्ष ॲड. राजेंद्र किंकर, नंदकुमार मराठे यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

**✻ महत्त्वाची सूचना ✻**

हीरकमहोत्सवी कोल्हापूर चित्पावन संघाच्या वतीने मराठी महिन्याची दिनदर्शिका प्रकाशित करण्यात आलेली आहे. सभासदांनी ती संघ कार्यालयातून घेवून जावी ही विनंती.

– अध्यक्ष

• Regd. No. MAHMAR/2015/66822 Navsneha Monthly •
Posting Under Concessional Rate Regd. No. KLR-335/2022-2024


# SHOGINI TECHNOARTS PVT. LTD.

ISO 9001-2008
UL Approved

Manufacturers of Printed Circuit Boards
Metal Clad PCBs for LED applications.




- Manufacturing Excellence in Fabrication of Single Layer, Two Layer & Multilayer PCBs.
- Multilayer PCBs - Prototype & volumes.
- High density SMT, Fine Line Boards - 6 mil Tracks/0.25 mm Via holes.
- RoHS Compliance
- Top Class Testing facilities including Universal BBT with SMD Testing.
- Large Manufacturing Capacity 1,60,000 Sq. mtrs. per annum.
- Well equipped plant with ultra modern Machines
- Fastest Delivery at competitive price.
- Satisfied Customers all over India & Abroad.
- CAD-CAM, Prototype, Large Scale Production under one roof.

**Quality Approvals**
ISO 9001-2000 Certified & UL Approved
Also approved by C-DOT, BSNL, RDSO




**HEAD OFFICE :**
"SHOGINI" S. No. 5 (P) Katraj-Dehuroad By Pass, Near Sinhagad Road Flyover, Ambegaon Budruk, Pune 411046 (INDIA)
Tel.: +91 20 6647 1700 Fax. : +91 20 6647 1714

**FACTORY :**
Gat No. 788, Khed - Shivapur, Taluka Haveli, Dist. Pune 412 205. (INDIA) Tel. : +91 20 6647 1800
Fax. : +91 20 6647 1820

**E-mail :** info@shogini.com

**Visit us at :** www.shogini.com


प्रति,
सौ./श्री.

कोल्हापूर चित्पावन संघाचे हे मुखपत्र संपादक-मुद्रक-प्रकाशक श्री. सदानंद दिनकर मराठे यांनी मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर येथे छापून कोल्हापूर चित्पावन संघ, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर येथून प्रकाशित केले आहे.